# सृजनरंग

अंक – ४

एप्रिल २०२३



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग : अंक – ४

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रेरणा** : **मा. रणजितसिंह देओल,** (भा.प्र.से.)
  मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. सूरज मांढरे,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **कौस्तुभ दिवेगावकर,** (भा.प्र.से.)
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक**: **डॉ. नेहा बेलसरे**
  उपसंचालक तथा विभाग प्रमुख (आयटी व प्रसारमाध्यम)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **मनिषा यादव**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक**: **सुवर्णा पवार**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथ. शाळा भोडे, ता. मुळशी, जि. पुणे तथा राज्य अभ्यासगट सदस्य
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी
  **राणी पाटील**
  अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर
  **संदीप वाकचौरे**
  उपशिक्षक, जि. प. प्राथ. शाळा कोंची, ता. संगमनेर, जि. अहमदनगर तथा राज्य अभ्यासगट सदस्य
  **सुवर्णा देशपांडे**
  माध्यमिक शिक्षिका, डे. ए. सो. चे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा
  **निवृत्ती आहेर**
  मुख्याध्यापक, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय आदर्श शाळा भोयेगाव, जि. नाशिक
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे)
- **मलपृष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम्, पुणे)
- **प्रथम आवृत्ती** : एप्रिल २०२३
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.




# सृजनरंग

## अंक – ४

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## प्रस्तावना

शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याच्या दृष्टीने शिक्षणातील विविध प्रयोगांची देवाणघेवाण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जे जे म्हणून चांगले असेल, ते ते स्वीकारणे आणि नव्याने उत्थान घडविण्यासाठी पावले टाकणे आवश्यक आहे. राज्य शासनाने नव्याने भूमिका घेऊन आदर्श शाळा निर्माण केल्या आहेत. राज्यातील आदर्श शाळांमधील सुरू असणाऱ्या विविध शैक्षणिक प्रयोगांची दखल घेऊन हा अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी यापूर्वी वेगवेगळ्या स्वरूपात प्रयत्न सुरु आहेत. त्या प्रयत्नांना निश्चितपणे काही प्रमाणात यशही मिळत आहे. तथापि राज्य सरकारने शिक्षणाच्या गुणवत्तेच्या व प्रयोगशीलतेच्या दृष्टीने आदर्श शाळा महत्त्वपूर्ण आहेत तसेच आदर्श शाळा या भौतिक सुविधांबरोबरच गुणवत्तेच्या दृष्टीने देखील विशिष्ट उंचीवर असायला हव्यात असे सूचित केले. त्या दृष्टीने या शाळांमध्ये अधिक प्रयोगशीलता निर्माण करण्याचे वेगवेगळ्या स्वरूपात प्रयत्न सुरु आहेत. या विविध उपक्रमांमुळे शाळांची गुणवत्ता उंचावण्यास निश्चित मदत झाली आहे. जे जे म्हणून शिक्षणक्षेत्रात चांगले आहे त्या सर्वांचे सार्वत्रिकीकरण होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरून सातत्याने प्रयत्न होत आहेत आणि त्या प्रयत्नांचाच हा एक भाग आहे. शाळांमध्ये सुरू असणारे विविध उपक्रम राज्यातील इतर शाळांपर्यंत पोहोचावेत, तसेच यांपासून प्रेरणा घेऊन नवनवीन उपक्रम आपल्या कल्पकतेने राबवून शालेय गुणवत्तेचा आलेख उंचावण्याच्या उद्देशाने 'सृजनरंग' या ई-अंकाची निर्मिती करण्यात आली आहे.

आपण सर्व जण जाणतो की, एकविसावे शतक हे गतिमान असून अनेकाविध क्षेत्रात सातत्याने बदल घडत आहेत. त्या अनुषंगाने सातत्याने समोर येणारी आव्हाने यशस्वीपणे पेलण्यास सक्षम होणे आणि ज्ञान प्राप्त करून कौशल्ये अंगीकृत करणे आवश्यक आहे. एकविसाव्या शतकातील शिक्षण हे सर्जनशील, चिकित्सक विचार, सहयोग, सहकार्य आणि संप्रेषण/संवाद यावर भर देणारे आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती झाल्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या संसाधने उपलब्ध होत असून माहितीचा महासागर सहजगत्या उपलब्ध होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परिणामकारक अध्ययन-अध्यापन पद्धती अवलंबविण्याची गरज आहे. शालेय अभ्यासक्रमातील विषयनिहाय विशिष्ट अथवा क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत अधिक सुलभतेने पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी विविध तंत्रे व कौशल्ये आत्मसात करणे देखील आवश्यक आहे. यासाठी पूरक कौशल्यांचा समुच्चय शिक्षकांच्या अंगी असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध आव्हांनांचा सामना करण्यासाठी आपल्या ठायी आत्मविश्वास निर्माण करून जीवन सुकर करणे, ही सध्याची गरज आहे. आदर्श शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक गुणवत्ता उंचावण्यासाठी कल्पकतेने विविध उपक्रम राबवत आहेत. 'शाळा एक समूह' म्हणून शालेय स्तरावर विविध उपक्रम राबवत असताना अनेक आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाऊन शालेय गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. हे कार्य निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे. गुणवत्तावाढीबरोबरच सुजाण नागरिकत्व जोपासण्यासाठी नावीन्यपूर्ण विचारधारा आणि उपक्रमांचा स्वीकार करून आपण सृजनशील दिशेने वाटचाल करूया. राज्यातील काही शाळांनी केलेल्या प्रयोगांची दखल या अंकात घेण्यात आली आहे. अशाच उपक्रमांवर आधारित 'सृजनरंग' या ई-अंकाचे आपण नक्कीच स्वागत कराल अशी खात्री आहे. या उपक्रमांमधून आपणाला प्रेरणा मिळेल आणि त्या प्रेरणेतून आपणही आपल्या शाळा अधिक गुणवत्तेच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी प्रयत्न कराल असा विश्वास वाटतो.

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका

◈ **'माणूस घडविणारी शाळा'** १
जि. प. वरिष्ठ शाळा, किनखेड पूर्णा

◈ **उपक्रमांची चालता वाट...** ५
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा, कवठे एकंद

◈ **उपक्रमांनी साधली गुणवत्ता** ७
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा, सिंदखेड (मोरेश्वर), जि. अकोला

◈ **अशी बदलली शाळा** १२
भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जि. प. कें. प्राथ. शाळा,
दिग्रस बु., जि. अकोला

◈ **सर्वांगीण विकासाची पाऊलवाट** १६
जि. प. प्राथ. केंद्र शाळा, नेवरी, ता. कडेगाव, जि. सांगली

◈ **माझी शाळा माझा अभिमान** १९
जि. प. शाळा, वर्णे, ता. जि. सातारा

◈ **शालेय मंत्रिमंडळ : संस्कारांचा मार्ग** २३
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करुंगली, ता. शिराळा, जि. सांगली

◈ **माझी शाळा : एक दृष्टिक्षेप** २७
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जि. प. शाळा वाडेगाव (मुले)

◈ **शैक्षणिक स्तर उंचावण्याकडे यशस्वी वाटचाल** ३०
जि. प. वरिष्ठ प्राथ. केंद्रशाळा, आडसूळ, पं. स. तेल्हारा, जि. अकोला

◈ **आदर्श शाळेच्या दिशेने वेगाने घोडदौड करणारी शाळा** ३३
जि. प. प्राथ. शाळा, सुतारवाडी (कासार आंबोली), ता. मुळशी, जि. पुणे.

# ‘माणूस घडविणारी शाळा’

*या कोवळ्या कळ्यामांजी, लपले ज्ञानेश्वर रवींद्र शिवाजी।*

*विकासता प्रकटतील समाजी शेकडो महापुरुष।।*

या वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील उक्तीप्रमाणे ध्येयासक्त होऊन वाटचाल करणारी शाळा म्हणजे जि. प. वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा किनखेड पूर्णा. किनखेड पूर्णा हे गाव पश्चिम विदर्भाची जीवनदायिनी असलेल्या खार पाणपट्ट्यात वसलेले आहे! अकोट पंचायत समितीमध्ये येणारी २७१ पटसंख्या असणारी जिल्हा परिषदेची ज्ञानवंत, गुणवंत, कीर्तीवंत विद्यार्थी घडविणारी दीपस्तंभासारखी सर्वांग सुंदर शाळा म्हणून संपूर्ण जिल्ह्यात सुपरिचित आहे.

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून राष्ट्रसंतांना अपेक्षित असलेला सुजाण नागरिक घडविण्यासाठी शाळा किनखेड पूर्णा विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे.

शाळेचे भव्य पटांगण, रमणीय परसबाग, नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र, इयत्ता पहिली ते सातवीचे वर्ग डिजिटल, क्रीडाक्षेत्रातील उत्तुंग भरारी, सर्व सन्माननीय पदाधिकारी आणि अधिकारी यांच्या कौतुकास पात्र ठरलेला ऐतिहासिक प्रसंगांना जिवंत करणारा परिपाठ या सर्व बाबी शाळेच्या लौकिकात भरच घालतात.

**नावीन्यपूर्ण ऐतिहासिक परिपाठ :**

संपूर्ण महाराष्ट्राचे प्रेरणास्थान असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्यशाली इतिहासाला उजाळा देणारा स्फूर्तिदायी ऐतिहासिक शिव परिपाठ, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या लढ्याला मानवंदना देणारा महात्मा फुले परिपाठ व भीम परिपाठ मुले मोठ्या अभिमानाने व आत्मविश्वासाने सादर करतात.

शिव परिपाठ सादर करताना शिवकालीन ऐतिहासिक भाषा त्यांच्या तोंडून ऐकताना त्यांच्यात बाजी, तानाजी संचारले आहेत असा उपस्थितांना भास होतो. फुले परिपाठ व भीम परिपाठ सादर करताना त्यांच्यात समतेची व मानवमुक्तीची कणव जाणवते. ऐतिहासिक परिपाठाच्या सादरीकरणातून विविध राष्ट्र पुरुषांच्या कार्याला उजाळा मिळतो.



त्यामुळे मुलांमध्ये राष्ट्रभक्ती, सुजाण नागरिकाची मूल्ये, समता, बंधुता या मूल्यांची रुजवणूक होते. मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, वक्तृत्वशैलीचा विकास होतो, शिवकालीन पात्रांचा परिचय होतो. दिवसभर चैतन्य व उत्साह मुलांमध्ये टिकून राहतो. राज्यस्तरीय इतिहास परिषदेमध्ये सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. मंजुश्रीताई पवार कोल्हापूर यांच्या उपस्थितीत मुलांनी सादर केलेल्या ऐतिहासिक शिव परिपाठाची उपस्थितांनी भरभरून स्तुती केली.

**कोरोना काळातील ऑनलाईन वर्ग :**

कोरोनाच्या महामारीमध्ये संपूर्ण जग बंदिस्त असताना सर्व शाळा बंद होत्या, परंतु जि. प. शाळा किनखेड पूर्णाचे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण घेत होते. गावातील पालकांनीसुद्धा शिक्षकांची तळमळ पाहून आपल्या पाल्यांना अँड्रॉइड मोबाईल उपलब्ध करून दिले. त्याकरिता सर्वप्रथम पालकांना गुगल मीट व झूम ॲपची माहिती होण्याकरिता शाळेमध्ये गटागटाने प्रशिक्षण वर्ग आयोजित केले. पालकांना मोबाईल साक्षर बनविले तसेच ऑनलाईन माध्यमातून कोरोना काळात बैल सजावट स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, खेळणी बनवा प्रशिक्षण आयोजित केले. अशाप्रकारे कोरोना काळातही अंधकारमय वातावरणात शाळेने ज्ञानज्योत अखंड तेवत होती.

या ऑनलाईन वर्गाला अकोट पंचायत समितीचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्री. गजानन सावरकर साहेब तसेच उपशिक्षणाधिकारी श्री. तायडे साहेब यांनी आकस्मिक भेट देऊन विद्यार्थ्यांशी हितगुज साधून कौतुक केले.

**७५ कोटी सूर्यनमस्कार सहभाग :**



स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्र सरकारच्या ७५ कोटी सूर्यनमस्कार या उपक्रमात जिल्हा परिषद शाळा किनखेड पूर्णा ने सहभाग नोंदविला. यावेळी संपूर्ण भारतातून एकाच वेळी १००० शाळा या उपक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण करत होत्या. त्या शाळांमध्ये किनखेड पूर्णा ही एक शाळा होती. या उपक्रमाची नोंद Golden Book of World Record मध्ये झाली व त्याचे प्रमाणपत्रसुद्धा शाळेला प्राप्त झाले. या कार्यक्रमाचे संयोजिका म्हणून सौ. नूतन देशपांडे यांनी काम पाहिले.

**अकोला आकाशवाणीवर स्वनिर्मित कविता सादरीकरण :**




शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका सौ. नूतन देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला आकाशवाणीवर स्वनिर्मित कवितांचे बहारदार सादरीकरण केले. या उपक्रमामुळे मुलांना लहान वयातच आकाशवाणीवर सादरीकरण करण्याची संधी मिळाली व त्यांच्यातील सृजनशीलतेचा, अभिव्यक्तीचा विकास झाला.

**ई–बुक कवितासंग्रह प्रकाशन :**

इयत्ता चौथीच्या मुलांनी वर्गशिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली ई–बुक कवितासंग्रह 'फुलपाखरू' ची निर्मिती केली. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः कविता लिहून त्याला अनुरूप चित्रांची निवड केली. या कवितासंग्रहाचे प्रकाशन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते झाले. तसेच विद्यार्थ्यांनी 'धूम' हे हस्तलिखितसुद्धा तयार केले.

**मूल्यांकन :**

शाळा विकास आराखड्यानुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यांकनासोबतच दैनंदिन जीवनातील वर्तनाचे मूल्यमापन करून शाळेमध्ये उत्कृष्ट विद्यार्थ्याला 'Student of the month Student of the year' हे पुरस्कार दिले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आदर्श व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यास मदत होते.

**स्वाध्याय :**

स्वाध्यायातून पाठ्यक्रमाची फलनिष्पत्ती किती प्राप्त झाली हे समजते. त्यामुळे विद्यार्थ्यांना दररोज स्वाध्याय दिला जातो. तो काळजीपूर्वक तपासला जातो. विद्यार्थी दररोज स्वाध्याय करतात त्यामुळे पालकवर्ग समाधानी आहे, तसेच खान अकॅडमीच्या माध्यमातून गणित विषयाचे संबोध दृढ होण्यासाठी ऑनलाईन स्वाध्याय दिला जातो. खान अकॅडमीवर २७१ पैकी २३८ विद्यार्थी जॉईन आहेत, तसेच स्वाध्यायासाठी गावात माता पालकांचे गट तयार केले आहेत, त्या विद्यार्थ्यांच्या स्वाध्यायावर सनियंत्रण करतात.

**माता पालक गट :**

निपुण भारत अंतर्गत माता पालक गटाची स्थापना शाळेमध्ये केली आहे. गावात तालुक्यातील सर्वांत जास्त म्हणजेच १८ माता पालक गट आहेत. व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून माता पालकांना व्हिडिओच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते. तसेच माता पालक गटाच्या सभा आठवड्याला दर शनिवारी आयोजित केल्या जातात तसेच लीडर माता व स्वयंसेवक आलेल्या अडचणी सोडविण्यास मदत करतात.

**वाचनालय :**

बालसाहित्य, कुमार साहित्य, कथासंग्रह, ऐतिहासिक पुस्तके, विज्ञानातील गमतीजमती इत्यादी विविध प्रकारच्या पुस्तकांनी शाळेचे ग्रंथालय सुसज्ज आहे. शाळेतील शिक्षक व विद्यार्थी शाळेला वाढदिवसानिमित्त पुस्तके भेट देतात व त्याची रजिस्टरमध्ये नोंद घेतली जाते.

**लोकसहभाग :**

समूह स्तरीय सामन्यांचे आयोजन आमच्या शाळेमध्ये असते. जवळपास अर्ध्या तालुक्यातील विद्यार्थी व शिक्षक खेळासाठी किनखेड पूर्णा येथे येतात. त्यांच्या जेवणाचा प्रश्न जेव्हा निर्माण झाला, तेव्हा ही समस्या शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांसमोर मांडली. गावकऱ्यांनी व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने जवळपास ७०० विद्यार्थी व शिक्षक यांना स्वादिष्ट भोजन दिले. लोकसहभागातून वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी १३ ट्री गार्ड व पाच सिमेंट बेंच शाळेला दिले.

**व्यवसाय कौशल्यवाढीस प्रयत्न :**

आपला ऐतिहासिक वारसा जतन व्हावा व शिक्षक आणि मुलांमध्ये इतिहासाची आवड निर्माण व्हावी या हेतूने शाळेतील शिक्षक श्री. संतोष झांमरे हे राज्यस्तरीय इतिहास परिषदांचे दरवर्षी आयोजन करतात. या परिषदेला नामवंत इतिहासकार जयसिंगराव पवार व मंजुश्रीताई पवार उपस्थित असतात. त्याचप्रमाणे त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित शिवशाहीच्या पाऊलखुणा हे पुस्तक इतिहास परिषदेत प्रकाशित केले. राज्यस्तरीय इतिहास विषयाच्या मॉडेल निर्मिती प्रशिक्षणात सहभाग घेतला.

**क्रीडा स्पर्धेतील उत्तुंग भरारी :**

मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबर शारीरिक विकास आवश्यक असतो. याकरिता शाळेतील शिक्षक प्रयत्नशील असतात. मागील तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या मुलांनी उत्कृष्ट प्रदर्शन करूनही आम्हाला उपविजेते पदावरच समाधान मानावे लागत होते; परंतु यावर्षी संपन्न झालेल्या तालुकास्तरीय क्रीडास्पर्धेत आमच्या विद्यार्थ्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून सामूहिक विजेतेपदाचे 'चॅम्पियन शील्ड' पटकावले. त्यामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. त्याबद्दल मा. गटविकास अधिकारी, मा. गटशिक्षणाधिकारी व ग्रामस्थांनी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे भरभरून कौतुक केले.



अशाप्रकारे शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच विविध सहशालेय उपक्रम राबवून शैक्षणिक क्षेत्रात जि. प. शाळा किनखेड पूर्णा घोडदौड करीत आहे. त्याकरिता केंद्रप्रमुख मा. श्री. सय्यद रब्बानी साहेब यांच्या मार्गदर्शनात शाळेचे कर्तव्य तत्पर मुख्याध्यापक श्री. रवींद्र चौथमल, शिक्षक सर्वस्वी श्री संजय सरदार, सौ. नूतन देशपांडे, सौ. संगीता म्हैसने, श्री. सचिन राजपूत, श्री. संतोष झांमरे, श्री. बाळकृष्ण वसतकार, श्री. विनोद शिवरकार प्रयत्न करत आहेत.

**जि. प. वरिष्ठ शाळा, किनखेड पूर्णा**

**संदर्भ :**

**शाळेच्या उपक्रमाची यूट्यूब लिंक**

**https://youtube.com/@vinodshivarkarkarsz.pschoolki729**

◈◈◈

# उपक्रमांची चालता वाट...

शाळा ही एक अशी जागा आहे, जिथे भावी समाजासाठी नागरिक घडवले जातात. ज्याठिकाणी शिक्षण हे तळागाळापर्यंत पोहोचवले जाते. त्याठिकाणी नक्कीच समाजहितकारक परिवर्तन पाहायला मिळते. असेच समाज परिवर्तनाचे काम करणारे केंद्र म्हणजे शाळा. सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यातील शाळा म्हणजे जिल्हा परिषद शाळा नं. १ कवठे एकंद.

**शाळेची इमारत :**



साहजिकच तालुका जवळ असल्यामुळे पटसंख्या कमी असावी असा सर्वांचा अंदाज; परंतु हा अंदाज चुकीचा ठरवत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत असणारी ही शाळा ३५० पटसंख्येच्या आसपास आहे. सध्या शाळेची गुणवत्ता, सुसज्ज इमारत, पटसंख्या इत्यादी कारणांमुळे राज्य मॉडेल स्कूलचा दर्जाही प्राप्त झाला आहे. चार पिढ्या घडवणारी ही शाळा फार पूर्वीपासूनच गावचे वैभव आहे. पूर्वीपासून दगडांच्या भिंती व कौलारू छत असणारी शाळेची वास्तू. २०१७-१८ साली गावकरी, शिक्षक, पालक, हितचिंतक या सर्वांच्या सहकार्यातून शाळेने नवीन रूप धारण केले. गावाने तब्बल ३४ लाख रुपयांचा शैक्षणिक उठाव करून, शासनाकडून प्राप्त काही अनुदान यातून भव्य-दिव्य अशी तीन मजली इमारत गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी उभी केली. इमारतीबरोबरच शाळेमध्ये विविध गोष्टींची उपलब्धता आहे. जसे सध्या मॉडेल स्कूल अंतर्गत इतर वर्गही सुसज्ज बनवले गेलेले आहेत. खेळासाठी मैदान व सर्व क्रीडा साहित्य उपलब्ध आहे.

**प्रयोगशाळा :**



शाळेमध्ये स्वतंत्र प्रयोगशाळा आहे. विविध प्रयोग स्वतः करण्याची सोय उपलब्ध आहे. शाळेमध्ये रोबोटिक्स साहित्यही उपलब्ध आहे. याचा उपयोग विज्ञान विषयात विशेष रस असणाऱ्या विद्यार्थ्यांना होत आहे. तसेच इतर विद्यर्थ्यांना विज्ञान विषयात अभिरुची निर्माण करण्याकरिता प्रयोगशाळा उपयोगी पडते.

**सांस्कृतिक सभागृह :**



एकावेळी २५० विद्यार्थी बसतील असे प्रशस्त सभागृह आहे. याचा उपयोग विविध कार्यक्रम घेण्यासाठी करता येतो. विविध महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, विविध कार्यक्रम, उपक्रम, शाळेतील एकत्रित शिकवले जाणारे घटक, एखादे प्रदर्शन भरविण्यासाठीही त्याचा उपयोग होतो.

**परिपाठ :**



संगीतमय परिपाठाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता जागृत रहावी यासाठी विविध उपक्रम घेतले जातात. शाळेला येताना वडीलधाऱ्या व्यक्तींच्या पाया पडून यावे. विद्यार्थी वाढदिवस, बोधकथा यांच्या माध्यमातून मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला जातो. परिपाठाच्या शेवटी एक कोडे दिले जाते. त्याचे उत्तर विद्यार्थ्यांना दुसऱ्या दिवशी विचारले जाते.

**वर्ग तितके उपक्रम :**

प्रत्येक वर्गाने स्वतंत्र असा एक उपक्रम तयार केला आहे.

**इयत्ता पहिली :** अभ्यासमित्र : मित्रांच्या जोड्या बनवून अभ्यास दिला जातो. कृती घेतली जाते.

**इयत्ता दुसरी :** माझी गोष्ट : दररोज विद्यार्थ्यांना एक गोष्ट सांगितली जाते, त्यांच्याकडून ऐकली जाते.

**इयत्ता तिसरी :** बालसभा : संपूर्ण संस्कृती कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थी करतात. अध्यक्ष, उपाध्यक्ष तेच निवडतात.

**इयत्ता चौथी :** English speaking : Daily one word recite and use it in the conversation and in drama playing.

**इयत्ता पाचवी :** शिष्यवृत्ती : एकूण विद्यार्थी संख्येच्या ९०% विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले आहेत. जादा तासिका घेतल्या जातात. जास्तीत जास्त विद्यार्थी गुणवत्ता यादीत यावेत याकरिता प्रयत्न केले जातात.

**इयत्ता सहावी :** वृक्ष लागवड व परिसर स्वच्छता : प्रत्येक विद्यार्थ्याने वाढदिवस हा ग्रंथालयास एक पुस्तक भेट देऊन व एक रोप शाळेत लावून करायचा असा निश्चय केला आहे.

**इयत्ता सातवी :** हिंदी भाषा : हिंदी भाषा विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे. स्वतः विद्यार्थ्यांना हिंदीमध्ये सूत्रसंचालन करण्यास सांगणे.

**इयत्ता आठवी :** शिष्यवृत्ती : जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मार्गदर्शन करणे. जादा तासिकांचे आयोजन करणे. याशिवाय शाळेचे एकत्रित असे अनेक उपक्रम राबवले जातात.

**श्री. विशाल विष्णू खाडे (सहशिक्षक)**
**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा**
**कवठे एकंद**

◈◈◈

# उपक्रमांनी साधली गुणवत्ता

महाराष्ट्र शासनाने दि. ५ मार्च, २०१९ च्या निर्णयाद्वारे आदर्श शाळा म्हणून जि. प. वरिष्ठ प्राथ. शाळा, सिंदखेड (मोरेश्वर) ता. बार्शीटाकळी जि. अकोला घोषित करण्यात आली.

आमची शाळा जिल्ह्यातील चार आंतरराष्ट्रीय शाळांपैकी एक होती हे सुद्धा विशेष. आमच्या शाळेला अतिशय सुंदर असा परिसर आहे. परसबाग आणि मोठ्या वृक्षांनी आमची शाळा सजलेली आहे. शाळेचा सध्याचा पट १९९ आहे. आमचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री. रतनसिंगजी पवार साहेब, केंद्रप्रमुख मा. श्री. वसंत शेवलकर, मुख्याध्यापिका सौ. सुषमा लांडे मॅडम यांच्या नेतृत्वात तसेच शिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे आमची उपक्रमशील आदर्श शाळा दिवसेंदिवस अधिक गुणवत्तापूर्ण होत आहे. ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष मा. श्री. आनंदभाऊ वानखडे, व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षणप्रेमी गाव असल्याने या सर्वांचा आम्हाला सदैव पाठिंबा असतो.

शाळा हे समाज विकासाचे, व्यक्ती विकासाचे प्रमुख केंद्र आहे. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या कलागुणांप्रमाणे विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचा सर्वांचाच प्रयत्न असतो. त्यासाठी विविध उपक्रमांची शाळेत रेलचेल असते. केवळ अभ्यास एके अभ्यास न करता अभ्यासपूर्वक तसेच संगीत, कला असे विविध उपक्रम शाळेत राबवले जातात. त्यामुळे शिक्षण हे खऱ्या अर्थाने आनंददायी, हसत-खेळत शिक्षण बनते.

**शाळेतील नावीन्यपूर्ण विविध उपक्रम :**

**१) वैविध्यपूर्ण परिपाठ :**



आमच्या शाळेतील परिपाठ अतिशय नावीन्यपूर्ण, मुलांच्या कलागुणांना वाव देणारा असतो. यामध्ये राष्ट्रगीत, संविधान, प्रतिज्ञा, सुविचार, म्हणी, सामान्यज्ञान, इंग्रजी संभाषण, इंग्रजी परिच्छेद वाचन संविधानाच्या कलमांचे वाचन, देशभक्तीपर गीत, प्रार्थना अशा विविध गोष्टींचा समावेश करण्यात येतो. वैविध्यपूर्ण परिपाठाने शाळेची सुरुवात मोठ्या उत्साहाने होते. विद्यार्थी वर्ग अभ्यासासाठी प्रेरित होतो. त्यांच्यातील सुप्त गुणांचा परिचयसुद्धा परिपाठातून होतो.


**२) कलादालन :**

विद्यार्थ्यांमधील संगीत व चित्रकला या गोष्टींची आवड लक्षात घेऊन त्यांना या क्षेत्रात मूलभूत ज्ञान मिळवून देण्याबरोबर या क्षेत्रात प्रगती कशी होईल याचा विचार करून अभिजात कला दालनाची

स्थापना करण्याची कल्पना शिक्षकांच्या मनात आली. अशा नावीन्यपूर्ण उपक्रमाला सुरुवात करण्याची चालना विद्यार्थ्यांच्या आवडीने निर्माण झाली.














शाळेमध्ये कलादालन समन्वयक मा. श्री. उमेशजी चव्हाण यांच्या हस्ते उदघाटन करून स्थापन करण्यात आले. या कलादालन कक्षात स्व. लतादीदी म्युझिक क्लब स्थापन करण्यात आला. या कक्षात आठवड्यातून तीन दिवस विद्यार्थ्यांना संगीताचे धडे देण्यात येतात. शाळेतील अनेक विद्यार्थी अतिशय आवडीने गायनाचे धडे घेत त्यांच्यातील ही गायनाची आवड पुढे नेण्यासाठी शिक्षकांकडून प्रयत्न केले जातात. शाळेतील उपक्रमशील शिक्षिका कु. डंबाळे मॅडम व खुमकर मॅडम या संगीत शिक्षिका गायन कक्षाची धुरा अतिशय समर्थपणे पेलत आहेत.

### ३) रंगसंगती चित्रकला कक्ष :


कलादालनातच रंगसंगती चित्रकला कक्षसुद्धा स्थापन करण्यात आला. या कक्षामध्ये विद्यार्थ्यांमधील चित्रकलेची आवड लक्षात घेऊन चित्रकलेकडे कल असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राथमिक ज्ञान दिले जाते. चित्रकलेचे वर्ग घेत असताना रंगाचे प्राथमिक ज्ञान, रंगसंगती इ. बाबींचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते आणि विद्यार्थ्यांमधील कला समृद्ध करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. यामुळे बरेच विद्यार्थी खूप सुंदर चित्र काढत आहेत. कलादालनामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः अनेक वाद्यांची सुंदर अशी चित्रे काढून कलादालनात संगीत आणि चित्रकला या दोन्हींची सांगड अतिशय सुंदरपणे घातली आहे. चित्रकला कक्षाची धुरा शाळेतील उपक्रमशील शिक्षक श्री. राठोड सर हे अतिशय प्रभावीपणे सांभाळतात.

**४) English activities :**

विद्यार्थ्यांना भविष्यात इंग्रजीची भीती वाटू नये, त्यांना इंग्रजी वाचन आणि संभाषण चांगल्या पद्धतीने करता यावे याकरिता शाळेमध्ये 'Jolly phonics' आणि 'English conversation' असे दोन उपक्रम राबविले जातात. वाचनाचा सराव घेतला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचनामध्ये सुधारणा झालेली आहे. इंग्रजी वाचनाची आवड त्यांच्यात निर्माण झाली आहे. सोबतच विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषण करता यावे यासाठी दररोज छोट्या छोट्या इंग्रजी संभाषणाचा सराव घेतला जातो. दररोज त्यांच्याकडून वेगवेगळ्या प्रकारची इंग्रजी वाक्ये तयार करून संभाषण सराव घेतला जातो. त्यामुळे आता अनेक विद्यार्थी न घाबरता इंग्रजी संभाषण सादर करतात.

**५) नवरात्र व्याख्यानमाला :**





नवरात्र म्हणजे स्त्रीशक्तीचा जागर. आदिमायेची उपासना करीत असताना वास्तविक जीवनातील ऐतिहासिक अशा विविध कर्तृत्ववान स्त्रीरत्नांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने नवरात्रीचे नऊ दिवस नवरात्र व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नऊ दिवस नऊ स्त्रीरत्नांची माहिती शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना व्याख्यान स्वरूपात दिली. शिवाय विद्यार्थिनींमधूनच प्रत्येक स्त्री प्रतिमा वेशभूषा करून अतिशय सुंदर पद्धतीने साकारण्यात आली. या उपक्रमामुळे खऱ्याखुऱ्या शौर्यशालिनी आणि कर्तबगार स्त्रियांचा परिचय विद्यार्थ्यांना झाला. यामध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, प्रियदर्शनी इंदिरा गांधी, रमाबाई आंबेडकर, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ, अहिल्याबाई होळकर, अंतराळवीर कल्पना चावला, डॉ. आनंदीबाई जोशी या स्त्रीरत्नांचा परिचय करून देण्यात आला. शिवाय विद्यार्थ्यांनी दुसऱ्या दिवशी निबंध स्वरूपात माहितीचे लेखनसुद्धा करून आणले.



**६) सामूहिक कवायत व खेळ :**

प्रत्येक शनिवारी शाळेमध्ये सामूहिक कवायत घेतली जाते. डंबेल्स, लेझीम कवायत, योग व प्राणायाम यांचा सराव घेतला जातो. सूर्यनमस्कार व विविध खेळांचा सराव आमचे शिक्षक मोठ्या उत्साहाने घेतात. अशा पद्धतीने शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते.

**७) नावीन्यपूर्ण विज्ञान कक्ष :**

शाळेतील नावीन्यपूर्ण विज्ञान कक्षामध्ये ५२९ प्रयोग आणि त्यासाठी आवश्यक साहित्य याची रचना अतिशय कल्पकतेने केलेली आहे. सर्व वर्गांच्या विद्यार्थ्यांच्या काठीण्य




पातळीनुसार १ ते २ तासिका घेतल्या जातात. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरवर प्रयोगांची माहिती दिली जाते. तसेच वेगवेगळे प्रयोग विद्यार्थ्यांना करून दाखवले जातात. विद्यार्थी स्वतः प्रयोग करतात व माहिती सांगतात. अशा प्रकारे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी नावीन्यपूर्ण विज्ञान कक्षाचा उपयोग होतो. विज्ञान कक्षाची धुरा येथील विज्ञान शिक्षक श्री. दीक्षित सर हे सांभाळतात.

**८) संविधानाच्या कलमांचे वाचन :**

दररोज परिपाठात मुले संविधान प्रास्ताविका म्हणतात, मात्र अर्थ कळतोच असे नाही. संविधान देशातील प्रत्येक नागरिकाला समजणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच दररोज २६ नोव्हेंबर पासून संविधानाच्या एका कलमाचे वाचन घेत असतो. कलमाचे वाचन आणि त्याचे थोडक्यात विश्लेषण केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना संविधानाने आपल्याला दिलेले अधिकार आणि कर्तव्य यांची खऱ्या अर्थाने जाणीव होत असते. विद्यार्थी ही कलमे एका वाक्यात सांगू शकतात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संविधानाची तोंड ओळख होते. देशाचे सुजाण नागरिक घडविण्याची ती पहिली पायरी आहे. याचा त्यांना भविष्यात नक्कीच फायदा होईल यात शंका नाही.






**९) श्यामची आई या पुस्तकाचे क्रमशः वाचन :**

विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, भावनिक विकास होणे गरजेचा आहे. नैतिकतेशिवाय असणारी बौद्धिक क्षमता समाजाला नेहमीच घातक ठरते. म्हणूनच विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत या उद्देशाने आम्ही आमच्या शाळेत सानेगुरुजी जयंतीचे औचित्य साधून २४ डिसेंबर पासून 'श्यामची आई' या सानेगुरुजी लिखित संस्कारक्षम पुस्तकाचे क्रमशः वाचन घेत आहोत. प्रभावी वाचन पद्धतीने मुलांवर या कथांचा चांगला परिणाम होत आहे. चांगुलपणाचे संस्काराने वर्तन बदल घडत आहे. अशी पुस्तक वाचनाची आवड मुलांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. त्याकरिता विद्यार्थी शालेय ग्रंथालयातून वाचनासाठी विविध पुस्तके घेतात. ऐकलेली कथा घरी जाऊन सांगतात व त्यातील आवडलेल्या गोष्टींची नोंद घेतात.

**१०) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :**

इयत्ता पाचवीमध्ये शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या विविध स्पर्धा परीक्षा असतात. यासाठी विद्यार्थी वर्गाची तयारी चौथीपासूनच केली जाते. विविध विषयांचे मार्गदर्शन व सराव शाळेमध्ये घेतले जाते.

इयत्ता पहिलीपासूनच विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान देण्याचा प्रयत्न असतो. अशा विविध उपक्रमांद्वारे शाळेचा संपूर्ण दिवस विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग साजरा करतात. अतिशय उत्साही आणि अभ्यासपूर्वक वातावरण निर्मिती शाळेत झाली आहे. यातून विद्यार्थ्यांचा अधिकाधिक विकास कसा साधता येईल याकरिता प्रयत्न करत आहोत.

**व्हिडिओ लिंक :**

https://youtu.be/NIKpIMmxorg

'श्यामची आई' या पुस्तकाचे क्रमश: वाचन

https://youtu.be/BEItTZWzQ90

गणितोत्सव साजरा

https://youtu.be/ZnkvaUfWc0c

गणितोत्सव साजरा २

https://youtu.be/zLqCUv7XFHU

नवरात्र नवोपक्रम

https://youtu.be/pYBD-1gCrSM

जॉली फोनिक उपक्रम

https://youtu.be/OGGOCjTKyco

हर घर तिरंगा उपक्रम

https://youtu.be/4bMvqvgXkkg

आनंद मेळावा उपक्रम

https://youtu.be/kj-aDO5Czy0

स्वागत गीत

https://youtu.be/bwLqEl825j8

नावीन्यपूर्ण उपक्रम

https://youtu.be/NtrG8MMqxEl

https://youtu.be/qzQARphiRVI

विठ्ठलाचे गाणे गात विद्यार्थ्याने काढले विठ्ठलाचे चित्र

https://youtu.be/xo4S6oewGro

गणितोत्सव साजरा २

https://youtu.be/cal6IKPTwsM

ऑईल पेंटने पाण्यावर डिझाईन काढणे

https://youtu.be/BGzNGsYTtaA

व्याख्यानमाला उपक्रम

https://youtu.be/2vLw2yxbXXg

दहीहंडी उपक्रम

https://youtu.be/qF9cYUIMSfU

मातीपासून गणपती बनविणे उपक्रम

https://youtu.be/Ja2F9ZcA92A

सांस्कृतिक कार्यक्रम

https://youtu.be/pLTH3y2Pau8

कविता गायन

https://youtu.be/lAYhPfpH37Y

शाळा प्रवेश दिंडी

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा**
**सिंदखेड (मोरेश्वर), केंद्र – राजंदा,**
**पं. स. बार्शी टाकळी, जि. अकोला.**

# अशी बदलली शाळा

*'नही ज्ञानेनं सदृश्यं पवित्रम मिहं विद्रयते'*

विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांना घडविण्यासाठी ज्यांनी स्वतःला बांधून घेतले आहे, अशा शिक्षकवर्गाने अंतर्मुख होऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. दूरदृष्टीने भविष्यातील परिस्थितीची कल्पना करणे, परिस्थितीला समर्थपणे सामोरे जाऊन व्यक्तिगत तसेच राष्ट्राचा विकास, स्थैर्य पुढच्या पिढीला कसे देता येईल यावर चिंतन करण्याची गरज आहे. शिक्षणक्षेत्रातील आपले अनुभव, आपला व्यासंग यावर समाजाचा विश्वास आहे, तो दृढ करण्याची जबाबदारी माझे सर्व सहकारी शिक्षक नियमितपणे पार पाडत आहेत.

आज वेगाने आक्रमण करू पाहणाऱ्या इंग्रजी शाळा व त्यांच्या शाखा यांना माझ्या जिल्हा परिषद शाळेने आव्हान उभे केले आहे. माझा प्रेमळ शिक्षकवृंद हा वेगवेगळ्या तंत्रांचा वापर करून शैक्षणिक कार्य पार पाडत आहे. शिक्षकांच्या अथक प्रयत्नामुळे शाळेने दैदीप्यमान कामगिरी केलेली आहे.

**शाळेची स्थापना व पार्श्वभूमी :**

जि. प. केंद्रशाळा दिग्रस (बु.) या शाळेची स्थापना दिनांक १० ऑगस्ट, १९०८ रोजी झाली. गावची लोकसंख्या १,५९८ आहे. सदर शाळेने आजपर्यंत असंख्य विद्यार्थी घडवून देशकार्यासाठी त्यांची सेवा उपलब्ध करून दिलेली आहे.

शाळेमध्ये २०१४-१५ या वर्षी वर्ग पहिली ते सातवी मराठी माध्यमाचे वर्ग सुरू होते. २०१४-१५ मध्ये सर्व शिक्षक बांधवांशी चर्चा करून विद्यार्थी संख्या वाढीसाठी एकाचवेळी पहिली ते सातवीचे सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू केले.

पालकांच्या आग्रहास्तव २०१५-१६ यामध्ये जि. प. शाळेत आठवीचा सेमी इंग्रजी माध्यमाचा वर्ग जिल्ह्यात सर्वप्रथम उघडण्यात आला. एवढे करूनसुद्धा इंग्रजी शिक्षणासाठी मुले प्राथमिक गटातून बाहेर जात होती. ती थांबविण्यासाठी लोकसहभागातून २०१६-१७ यावर्षी मध्ये एकाचवेळी नर्सरी, केजी १, केजी २ चे वर्ग सुरू करण्यात आले. त्यामुळे गावातील एकही विद्यार्थी बाहेरगावी न जाता याच शाळेत दाखल होतात.

विद्यार्थी पटसंख्या सातत्याने टिकून राहण्यासाठी काळाप्रमाणे बदलत राहिल्यामुळे पातूर तालुक्यातील धडपडणारी एकमेव शाळा म्हणून सर्वत्र नावलौकिक झाला. याची दखल घेऊन २०१९-२० या वर्षी महाराष्ट्र शासनाने शाळेला महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ (MIEB) बोर्डाची मान्यता देऊन नवीन सुधारित वर्ग पहिली ते तिसरीसाठी मराठी माध्यमाचा अभ्यासक्रम सुरू झाला. त्याच वर्षी मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते या शाळेचे मुख्याध्यापक श्री. संजय दे. बरडे यांचा गौरव झाला.

शाळेची शैक्षणिक प्रगती पाहून आजूबाजूच्या तांदळी (बु.), तांदळी (खु.), सस्ती, तुलंगा (बु.), तुलंगा (खु.), दिग्रस (खु.) इत्यादी गावातील पालकांनी आपली मुले या शाळेत दाखल करण्यास सुरुवात केली.

आज बाहेर गावातील जवळपास ४० विद्यार्थी शाळेत दाखल आहेत. त्यानंतर शासनाने २०२१-२२ या वर्षी या शाळेला आदर्श शाळा म्हणून घोषित केले.

### लोकसहभाग :

शाळेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पालक व गावकरी मंडळी शाळेला मदत करतात. आजपर्यंत वस्तू व रोख रकमेच्या स्वरूपात श्रमदानातून जवळपास ८.५० (साडे आठ) लाख रुपये मदत केली आहे. वस्तू स्वरूपात पिण्याच्या पाण्याची टाकी, माईक, जेवणाची ताटे, चटया, ग्रीन नेट, डिजिटल क्लासरूम, LED, परसबाग, शाळेचे मुख्य लोखंडी प्रवेशद्वार, रंगरंगोटी इत्यादी स्वरूपात मदत केली आहे.

### शाळेत उपलब्ध भौतिक सुविधा :

पिण्याचे पाणी, मुलांमुलींसाठी स्वतंत्र शौचालय, डिजिटल क्लासरूम, सी.सी.टिव्ही कॅमेरे, संगणक कक्ष, नावीन्यपूर्ण विज्ञान कक्ष, प्रोजेक्टर रूम, किचन शेड, कचरापेटी, हँडवॉश स्टेशन, परसबाग, आकर्षक परिसर, चप्पल स्टँड, पायदान.

### शाळेत राबविण्यात येणारे विविध उपक्रम :

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी व गुणवत्तेसाठी शाळेत वर्षभर सहशालेय व अभ्यासपूरक उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते. त्यामध्ये १) शिक्षकांचे वाढदिवस साजरे करणे. २) उपस्थिती ध्वज ३) बाल आनंद मेळावा ४) निबंध लेखन स्पर्धा ५) स्वयंशासन दिवस ६) गटवार अध्यापन पद्धती ७) स्वच्छता अभियान ८) लेझीम पथक ९) शोषखड्डा १०) रेन वॉटर हार्वेस्टिंग ११) परसबाग १२) दत्तक पालक योजना १३) व्यसनमुक्ती कार्यक्रम १४) विविध स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती, नवोदय विद्यालय, NMMS, चित्रकला, रांगोळी स्पर्धा, प्रश्नमंजुषा, हस्ताक्षर स्पर्धा, खेळ व क्रीडा स्पर्धा १५) बालसभा १६) हळदीकुंकू महिला मेळावा १७) सहभोजन १८) वनराई बंधारा १९) सामूहिक कवायत व योगासने २०) जयंती, पुण्यतिथी, दिनविशेष २१) शैक्षणिक सहली २२) पालकसभा २३) शालेय शैक्षणिक साहित्य निर्मिती २४) टाकाऊपासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती २५) कार्यानुभव साहित्य निर्मिती २६) सामाजिक कार्यात सहभाग २७) दिव्यांग समावेशित शिक्षण २८) वृक्षारोपण २९) शालेय परिपाठ ३०) बचतीचे महत्त्व (बचत बँक) ३१) बालवाचनालय इत्यादी.

### कोविड-१९ काळातील मुलांचे शिक्षण :

एकच ध्यास गुणवत्ता विकास या ध्येयाने मार्गक्रमण करीत असताना अचानक जागतिक महामारी कोविड-१९ चा सर्वत्र प्रसार झाला. त्या अनुषंगाने विद्यार्थी हित लक्षात घेता शासन स्तरावरून शाळा बंद ठेवण्याचे आदेश आले. तरीही शाळा बंद; पण शिक्षण सुरू या राज्यस्तरीय उपक्रमाच्या माध्यमातून मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यार्थी हित जपून विविध शैक्षणिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थी शिक्षणविषयक उपाययोजना करण्यात आल्या. त्यामध्ये स्मार्टफोनचा वापर करून गुगल मीट व झूम ॲपद्वारे

प्रत्यक्ष विद्यार्थी सहभागादवारे वर्ग अध्यापन करण्यात आले. ज्याच्याकडे स्मार्ट फोन नव्हते त्यांच्यासाठी फोन कॉल, प्रत्यक्ष गृहभेटी देऊन गृहपाठाचे आयोजन केले गेले. त्यासाठी विद्यार्थी स्वाध्याय पुस्तिका तयार करून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आल्या.

पालकांनीसुद्धा सकारात्मक प्रतिसाद देऊन आपापल्या पाल्यांसाठी स्मार्टफोन उपलब्ध करून दिले. त्यामुळेच जवळपास ७०-८० टक्के विद्यार्थी हे नियमित ऑनलाईन क्लासला उपस्थित राहिले. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नाही याचा परिणाम म्हणून परिसरातील इतर गावातील पालकांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मुलांची नावे काढून या शाळेत घातली.

## शाळेला मान्यवर अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या भेटी

### अधिकारी (सन २००९-१० ते २०२१-२२)

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी - ई रविद्रंन २) मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी - डॉ. कमलकिशोर फुटाणे ३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी - श्री कैलासजी पगारे ४) मा. शिक्षणाधिकारी (प्राथ) - डॉ. वैशाली ठग मॅडम ५) मा. उपशिक्षणाधिकारी - श्री. डॉ. सुनील भोकरे ६) मा. शिक्षणाधिकारी (प्राथ)- श्री. देवेंद्र अवचार साहेब ७) मा. उपशिक्षणाधिकारी - श्री. गौतम जाधव साहेब ८) मा. डायट प्राचार्य - श्री. प्रकाश जाधव साहेब ९) मा. डायट प्राचार्य - श्री समाधानजी डुकरे साहेब १०) मा. तहसिलदार - श्री सोहम वायाळ साहेब ११) मा. तहसिलदार - श्री. एस. व्ही गायकवाड साहेब १२) मा. उपजिल्हाधिकारी - श्री. दिपक बाजड साहेब १३) मा. गटविकास अधिकारी - श्री. बी. एस. पाचपाटील १४) मा. गटविकास अधिकारी - श्री. एम. बी. मूरकुटे १५) मा. गटविकास अधिकारी - श्री. अनिल बोंडे १६) मा. गटशिक्षणाधिकारी - श्री. दिनेश तरोडे, श्री. अरुण मुंदडा, श्री. अनिल अकाळ, श्रीमती दीपमाला भटकर, श्री. उल्हास घुले १७) मा. शा. पो. आ. अधिक्षक - श्री. प्रशांत घुले, श्री. मनोज गवई, कु. वर्षा कल्याणकर

### पदाधिकारी :

१) मा. जि. प. अध्यक्षा - सौ पुष्पाताई इंगळे २) मा. जि. प. शिक्षण सभापती - सौ. जयाताई गावंडे ३) मा. जि. प. कृषी सभापती - श्री. नितीनबापू देशमुख (विद्यमान आमदार) ४) माजी आमदार - श्री. बळीरामजी सिरस्कार ५) मा. जि. प. शिक्षण सभापती - सौ. लिलाबाई जाधव ६) मा. सभापती पं. स. पातूर - श्री. अनंताभाऊ बगाडे ७) मा. जि. प. सदस्य/उपाध्यक्ष - श्री. सुनीलभाऊ फाटकर ८) श्री. आमले सर प्राचार्य - श्री जागेश्वर कॉन्व्हेंट वाडेगाव ९) एकूण ४० व्यवस्थापन समितीने शाळांना भेटी दिलेल्या आहेत.

### आज रोजी कार्यरत शिक्षक वर्ग/पटसंख्या

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री संजय दे. बरडे | उच्च श्रेणी मू. अ. | २) | श्री. सुरेश गो. कातखेडे | प. शि. |
| ३) | श्री. सुभाष तु. टोळे | वि. शि. | ४) | कु. ओमलता उंबरकार | वि. शि |
| ५) | श्री. दिपाली अंबरकार | स. अ. | ६) | कु. वदंना भामोद्रे | स. अ. |

७) कु अनिता खडसे स. अ. ८) कु. सुरेखा बिजवे स. अ.

९) श्री. अनंत ना वाघ स. अ

एकूण पटसंख्या वर्ग १ ते ८ = २३९

कॉन्व्हेट नर्सरी ते केजी २ = ३५

एकूण = २७४

**समारोप :**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत उपक्रमशील राहून विद्यार्थ्यांचा विकास करणे व भविष्यात होणाऱ्या बदलाशी अनुरूप शिक्षण व उपक्रम आयोजित करणे. निरंतर चालणाऱ्या शिक्षण प्रक्रियेमध्ये उत्साहाने कार्यतत्पर राहून कार्य करणेसाठी शाळेला आकर्षक मैदान उपलब्ध करून घेणे, शालेय परिसरामध्ये लॉन निर्मिती करणे. शाळेसाठी पुरेशा वर्गखोल्यांची निर्मिती करणे (एकूण आवश्यक ६ वर्गखोल्या) भूगोल व इतिहास कक्षांची निर्मिती करणे, प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र टॅब पुरविणे, शाळेच्या स्व मालकीच्या स्कूल बस, अद्ययावत संगणक लॅब निर्मिती करणे,आंतरजाल सुविधा निर्माण करणे, खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध करणे.

अशाप्रकारे भविष्यात शाळा प्रगतीसाठी शाळेतील कार्यरत उच्चशिक्षित व तज्ज्ञ शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती, समस्त पालकवर्ग, गावकरी मंडळी, ग्रामपंचायत तसेच जि. प. प्रशासनाच्या सहकार्याने शाळेला पुढे नेण्याचा मानस आहे.

**श्री. संजय दे. बरडे (मुख्याध्यापक)**
**भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय**
**जि. प. केंद्रीय प्राथ. शाळा,**
**दिग्रस बु., पं. स. पातूर, जि. अकोला.**

◈◈◈

# सर्वांगीण विकासाची पाऊलवाट



विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजेच 'शिक्षण' होय. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक प्रगतीसाठी

पाठ्यक्रम तसेच त्यावर आधारित उपक्रम विविध स्तरांवर राबविले जातात. शासनाने संपूर्ण महाराष्ट्रभर आदर्श शाळा निर्माण करण्याचे ठरविले आहे. त्यावर उत्कृष्ठपणे कार्यवाही ही सुरू आहे.

सांगली जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रकारे निसर्गाचे व शैक्षणिक वारसा लाभलेला जिल्हा आहे. सांगली जिल्ह्यात कडेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेवरी ही एक आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. या शाळेचे मुख्याध्यापक श्री. दीपक साहेबराव मोहिते हे आहेत. ही शाळा शासनाने 'राज्य मॉडेल स्कूल' म्हणून निवडलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून आदर्श राज्य मॉडेल स्कूलचा इयत्ता १ली चा पाठ्यक्रम सुरू झाला. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी हे प्रशिक्षण घेतले गेले.

**पुस्तक संच :**

प्रथम सत्राच्या सुरुवातीस सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक संच वाटण्यात आले. नवीन पुस्तकांचे संच पाहून विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

**अध्ययन-अध्यापन स्थिती :**

राज्यात कोविड १९ च्या परिस्थितीमध्ये शाळा बंद होत्या; परंतु पुढच्या वर्षी शाळा सुरू झाल्याने अध्यापन सुरू करण्यात आले. कोविड १९ च्या काळात फक्त सांगली जिल्ह्यात शाळा सुरू होत्या.

**परिसर अभ्यास/पूरक उपक्रम :**

विद्यार्थी कोणत्याही गोष्टीकडे, वस्तूकडे कुतूहलाने पाहतात. कोणत्याही गोष्टीची माहिती करून घेण्याची त्यांची जिज्ञासा असते.

आमच्या शाळेत दररोज विविध उपक्रम राबविले जातात. सकाळी परिपाठाच्या वेळी, त्या तारखेचा पाढा घेतला जातो. तसेच एखाद्या विद्यार्थ्याचा वाढदिवस असेल, तर तो साजरा केला जातो. त्याचप्रमाणे

परिपाठात दररोज सामान्यज्ञानाचा उपयोग केला जातो. त्यामुळे दररोजच्या अध्यापनात वेगळे उपक्रम घेऊन मनोरंजकता आणली जाते.

वर्गामध्ये दररोज अनेक उपक्रम घेतले जातात. उदा., प्राण्यांचे मुखवटे बनवणे. त्यामुळे विद्यार्थी प्राणी ओळखतात. त्यांना प्राण्यांविषयी आपुलकी निर्माण होते. प्राण्यांविषयी दया, संवेदना निर्माण होण्यास मदत होते.

**भाषाशिक्षण उपक्रम :**

मुले ही संवेदनशील असतात. परिसरातून विविध गोष्टी शिकतात. भाषेतून आपले विचार, भावना, गरजा व्यक्त करतात. मुले ही आपल्या मातृभाषेतूनच बोलतात. इतर अनेक भाषांचा परिणाम त्यांच्यावर होत असतो. जसे इंग्रजी शब्द – बस, रेल्वे, रोड, पेन, बूक, बॅट इ. दररोज परिपाठाला इंग्रजी शब्द व त्यांचे अर्थ सांगितले जातात. त्याचा परिणाम इंग्रजी शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांना समजतो. मराठी शब्द पटलावर अक्षरांची ओळख करून दिल्यामुळे मुलांच्या फार काळ लक्षात राहते.

**गणिती भाषा संबोध :**

विद्यार्थ्यांना घरातूनच गणिताची ओळख झालेली असते. उदा., घर शाळेपासून किती अंतरावर आहे. सूर्य कधी उगवतो? सूर्य कधी मावळतो? दुकानातून वस्तू विकत आणणे, वस्तू विकणे इत्यादी अशा उपक्रमातून ० ते १० ची ओळख मुलांना अतिशय मनोरंजकपणे करून दिल्याने त्यांच्या चिरकाल लक्षात राहण्यास मदत होते.

**संकल्पनेतून शाळा स्तरावर राबविलेले उपक्रम :**

**१) दप्तराविना शाळा :**

आठवड्यातून एक दिवस म्हणजे प्रत्येक शनिवारी दप्तराविना शाळा घेतली जाते. त्या दिवशी फक्त वेगवेगळे उपक्रम व खेळ घेतले जातात. त्याचबरोबर त्या दिवशी शाळेत दप्तर आणायचे नसल्याने विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी होते.

**२) शालेय परिसराची स्वच्छता :**

दररोज शालेय परिसर स्वच्छ केला जातो. त्यातून परिसर स्वच्छतेचे महत्त्व समजते. कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची याविषयी माहिती दिली जाते.



## ३) पाढे पाठांतर :

या उपक्रमातून विद्यार्थ्यांकडून पाढे पाठ करून घेतले जातात. त्यामुळे त्यांना गुणाकार व भागाकार या क्रिया सोप्या जातात.

## दैनंदिन उपक्रम :

१) ढोल–ताशांच्या तालावर राष्ट्रगीत घेतले जाते.
२) वाढदिवसाचे दिवशी विद्यार्थ्यांना गोष्टीचे पुस्तक भेट दिले जाते.
३) शाळेत दररोज वर्गापुढे उपस्थिती ध्वज लावला जातो.
४) स्वच्छ व टापटीप गणवेश, गृहपाठ तपासणी घेऊन रोज ५ स्टार दिले जातात.
५) दररोज शाळा सुटल्यानंतर वंदे मातरम् घेतले जाते.
६) ग्रंथालयातील पुस्तके व ग्रंथांची दररोज देवाणघेवाण केली जाते.
७) मध्यान्ह भोजनाच्या वेळी हात स्वच्छ करणे व श्लोक घेतले जातात.
८) प्रत्येक महिन्याला पालकसभा घेतली जाते.
९) विविध थोर महात्म्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या केल्या जातात.
१०) शाळेत शिक्षक दिन साजरा केला जातो.
११) परिसर भेट घेतली जाते.
१२) रक्षाबंधन, तीळगुळ कार्यक्रम घेतले जातात.
१३) माता पालकांसाठी हळदी–कुंकू कार्यक्रम घेतला जातो.
१४) बालआनंद मेळावा घेतला जातो.
१५) शाळेत विविध क्रीडा स्पर्धा, वार्षिक स्नेहसंमेलन घेतले जाते.
१६) शाळेत अपंग दिनानिमित्ताने अपंग विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेतल्या जातात.
१७) 'लेक वाचवा, लेक शिकवा' या अभियानांतर्गत प्रभात फेरी काढली जाते. नवागतांचे स्वागत हे ही प्रभात फेरी काढून केले जाते.
१८) विज्ञान प्रदर्शन, माझी बँक, बँका, पोस्ट ऑफिस, पतपेढीला भेट देणे.
१९) शाळेत झांज पथक, लेझिम पथक तयार केले आहे. अशाप्रकारे दैनंदिन उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो. शाळेत १००% उपस्थिती राहते. गळती थांबवण्यास मदत होते.

**श्री. तुकाराम प्रल्हाद साठे**
**जि. प. प्राथ. केंद्र शाळा, नेवरी,**
**ता. कडेगाव, जि. सांगली.**

◈◈◈

# माझी शाळा माझा अभिमान




महाराष्ट्र शासनाने आदर्श शाळा करण्याचा निर्णय घेतला. त्यात सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा – वर्णे या शाळेची निवड झाली.


शाळेत २९० विद्यार्थी शिक्षण घेत असून पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेची इमारत आकर्षक आणि बोलक्या भिंती आहेत. प्रत्येक वर्गापुढे परिसरबाग असल्यामुळे शालेय परिसर अगदी खुलून गेला आहे. शाळेच्या भिंती बोलक्या करण्यासाठी कोरोना काळात सर्व शिक्षकांनी खूप कष्ट घेतले आहे.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांचा कलात्मक, क्रीडात्मक व सामाजिक विकास व्हावा म्हणून शालेय वार्षिक नियोजनात विविध उपक्रमांची क्रमबद्ध आणि सुसंगत मांडणी केली जाते. त्यामुळे आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व स्पर्धेत वक्तृत्व, निबंध, प्रश्नमंजुषा, बुद्धिबळ, कुस्ती या स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली.

## शिक्षक–शिक्षक आंतरक्रिया :

मुलांना घडवण्याचा वसा घेतलेल्या आमच्या शाळेतील शिक्षकवृंद यांच्यामध्ये कायम सकारात्मक आंतरक्रिया होते. अध्ययन निष्पत्तीनुसार जसे मूलनिहाय नियोजन करतो तसे प्रत्येक मुलाच्या क्षमतेनुसार त्याला कोणत्या क्षेत्रात अधिक मार्गदर्शनाची गरज आहे? त्यासाठी काय करता येईल याबाबत सतत अनौपचारिक चर्चा सुरू असते. प्रत्येक शिक्षकाच्या मनात केवळ शाळेचा विकास आणि मुलांची प्रगती एवढ्या दोनच गोष्टी असतात.

### शाळा–समाज आंतरक्रिया :




कोणत्याही शाळेची प्रगती व्हायची असेल, तर समाजाचा सकारात्मक सहभाग आवश्यक असतो. शाळेच्या विकासात विद्यार्थी, शिक्षक व पालक हा त्रिकोण पूर्ण होणे आवश्यक असते. वर्णे येथील सर्वच ग्रामस्थ व पालक शाळेबाबत सकारात्मक दृष्टिकोन असणारे आहेत. शाळा व्यवस्थापन समिती कायमच शाळेच्या सर्वच उपक्रमांमध्ये सहभागी असते. प्रशासकीय किंवा सामाजिक कोणतीही अडचण आली तरी शाळा व्यवस्थापन समिती पाठीमागे उभी असते. त्यामुळे येथे काम करण्यासाठी शिक्षकांनाही खूप उत्साह वाटतो.

### शाळा राबवीत असलेले नावीन्यपूर्ण उपक्रम :

#### १) आदर्श परिपाठ :



शाळेतील दिवसाची सुरुवात आदर्श परिपाठाने होते. शाळेत मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषेत परिपाठ घेतला जातो. रोज दिनविशेषाचे स्पष्टीकरण करून सांगितले जाते. प्रत्येक दिवशी एका वर्गाचे नाट्यीकरण सादर करण्याची जबाबदारी वर्ग शिक्षकांवर दिली जाते. विद्यार्थी नाट्यीकरणाला लागणारे साहित्य स्वतः जमवतात. आवश्यक तयारी विद्यार्थी स्वतःच करत असतात. सामान्य ज्ञानाचे रोज पाच प्रश्न अगोदर फळ्यावर लिहून दिले जातात, याची उत्तरे मुले पालकांना विचारून, पुढील वर्गातील विविध मुलांना विचारून शोधतात. यामुळे सर्वच मुलांचे सामान्य ज्ञान वाढते. याचेच फलित म्हणून तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत लहान गट आणि मोठा गट या दोन्ही गटांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवला. विज्ञान प्रदर्शनानिमित्त झालेल्या प्रश्नमंजुषेत मोठ्या गटाने आठवीच्या मुलांबरोबर चमकदार कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवला.

#### २) भूमिका पालन :

भूमिका पालन या अध्ययनानुवर्ती उपक्रमांतर्गत मुलांना पाठ्यपुस्तकातील एखादी व्यक्तिरेखा तसेच सामाजिक, क्रीडा, संशोधन, साहित्य या क्षेत्रांतील एखादी व्यक्तिरेखा दिली जाते. मुले त्यानुसार वेशभूषा करतात आणि आपला परिचय सर्व विद्यार्थ्यांपुढे देतात.



आपल्याला मिळालेल्या व्यक्तिरेखेबद्दल बोलायचे असल्याने, मुले त्यासाठी त्या व्यक्तीचा अभ्यास करतात, त्यासाठी संदर्भ ग्रंथ वाचतात, फोटो मिळवतात आणि त्या व्यक्तीबद्दल संपूर्ण माहिती स्वतः गोळा करतात. यामुळे एखाद्या महानव्यक्तीचा आदर्श मुलांपुढे उभा राहतो. या उपक्रमामुळे व्यक्तीपासून व्यक्तित्व होण्यापर्यंतचा प्रवास मुले स्वतः अनुभवतात. कोणतीही गोष्ट सहज मिळत नाही त्यासाठी कष्ट करण्याची तयारी, सचोटी हे गुण अंगी असले पाहिजेत हे या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या लक्षात येते.

**३) माझे विचार माझे लेखन :**

पाचवी ते सातवीच्या वर्गात माझे विचार माझे लेखन हा उपक्रम राबवला जातो. या अंतर्गत मुलांना रोज एक विषय दिला जातो. यावर कमीत कमी वीस आणि जास्तीत जास्त कितीही ओळी मुले लिहितात. यासाठी लागणाऱ्या चारोळ्या, कविता, महापुरुषांची वाक्ये यांचा संग्रह मुलांनी केला आहे. दोन महिन्यांसाठीच हा उपक्रम राबवला गेला; परंतु या कालावधीत मुले व्यक्त होऊ लागली. विशेष म्हणजे एरवी शांत असणारी, अबोल असणारी मुलेसुद्धा स्वतःच्या भाषेत चांगले लिहायला लागली. मुलांना लेखनाची गोडी निर्माण झाली. मुले आपले अक्षर चांगले यावे शुद्धलेखनाच्या चुका होऊ नयेत याबाबत जागरूक झाली.

**४) पहाटेची अभ्यासिका :**



इयत्ता पाचवी ते सातवीच्या स्कॉलरशिपला प्रविष्ट मुलांना पहाटे उठणे अनिवार्य केले आहे. यासाठी वारंवार लवकर उठण्याबाबतचा आढावा घेतला जातो. घरी पालकांना सूचना दिल्या जातात. पहाटे उठून गणित, इंग्रजी, विज्ञानाचा अभ्यास करायला सांगितला जातो. या उपक्रमामुळे सर्वच विद्यार्थ्यांच्या घरी लवकर उठण्याच्या बाबतीत जागरूकता निर्माण झाली आणि मुलांच्या प्रगतीत सकारात्मक बदल दिसून आला.

## ५) कोशिश से कामयाबी तक :

या उपक्रमांतर्गत आपल्या पंचक्रोशीतील कोणत्या क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींचा मुलांशी संवाद, मुलाखतीचे आयोजन केले जाते. मुलांना स्पर्धा परीक्षेतील यशस्वी व्यक्ती, कलाकार, व्यावसायिक यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला जातो. या अंतर्गत पाणी फाउंडेशनचे श्री. आबा लाड, माजी शिक्षणाधिकारी श्री. यशवंत निकम यांच्यासोबत संवादाचा लाभ मुलांनी घेतला.

अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी अभ्यासक्रमातील अध्ययन अनुभवाबरोबर इतरही अध्ययन अनुभवांची सुसंगत मांडणी केली जाते यातून अध्ययन अनुभव आणि अध्ययन निष्पत्ती यामध्ये सुसंगती ठेवली जाते.



अगदीच उपक्रमांची रेलचेल न करता मोजकेच; पण शंभर टक्के परिणाम देणारे उपक्रम कसे राबवता येतील याबाबत शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुभाष माने सर व सर्व शिक्षक प्रयत्नशील असतात. शाळेतील इतर अभ्यासपूरक पक्रम विज्ञान प्रदर्शन शाळा स्तर, बाजार, परिसर भेट, कार्यानुभव कार्यशाळा, वार्षिक स्नेहसंमेलन, लघुउद्योग केंद्र भेट, रोबो किट कार्यशाळा, प्रश्नमंजुषा. अभ्यासपूरक उपक्रमाचे पुढील फायदे मुलांच्या वर्तनात बघायला मिळाले.

१) मुले वेळेचा सदुपयोग करू लागली.

२) मुले स्वतः ज्ञान मिळू लागली, स्वतः ज्ञानाचा उपयोग करू लागली.

३) विद्यार्थ्यांच्या शरीराला आणि मनाला योग्य वळण लागले.

४) मुलांच्या चारित्र्यनिर्मितीत लाभदायक.

५) मुले स्वतःची जबाबदारी ओळखू लागली.

**दिपाली सचिन पंडित**

**उपशिक्षिका,**

**जि. प. शाळा- वर्णे, ता. जि. सातारा**

◈◈◈

# शालेय मंत्रिमंडळ : संस्कारांचा मार्ग

शाळा हे एक समाजाचे लघुरूपच आहे. शाळेपासून बालवयातील अनेक संस्कार विद्यार्थ्यांना प्रेरित करून त्यातून विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते. ज्या वेळी विद्यार्थी शाळेमध्ये प्रवेश घेत असतो. त्या वेळी त्याच्या बालमनावर घर आणि समाजातील विविध विचारांचा पगडा असतो. शाळेत प्रवेशित झालेला विद्यार्थी सरासरी सहा ते सात महिने अंतर्मनातील रचित ज्ञानाचे दरवाजे खुले करीत नाही. आईसारखे कोमल मन असणारा एखादाच शिक्षक अशा प्रकारचे दरवाजे उघडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतो; तो बहुतेक वेळा अपवादाच ठरतो. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे वर्तन हे बहुतेक वेळा लाजरे–बुजरे, थोडेसे भित्रे असलेले दिसून येत असते. याचाच अर्थ असे विद्यार्थी एखादया फुलपाखरासारखे वाटतात. अशा विद्यार्थ्यांना स्वच्छंदी वातावरणाची गरज असते. अशा स्वच्छंदी वातावरणामुळे विद्यार्थी आपल्या अंतर्मनाचे कप्पे स्वतःहून उघडत असतात. त्यातूनच विद्यार्थ्यांच्या आवडी–निवडी कळतात. बालवयातील तो आलेख वयपरत्वे वाढत जातो. त्यामध्ये अनेक प्रकारचे बदल होत जातात.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे वय व नैसर्गिक विचार करण्याची त्यांची एक विशिष्ट प्रकारची पद्धत असते. या वयामध्ये इंद्रिय विकास होत असतो. विद्यार्थी अनेक गोष्टी, प्रसंग पाहत असतात. या वयात अनेक इंद्रियसंस्कार दृढ होतात. अर्थातच प्राथमिक स्तरावरील इंद्रियांची प्रगल्भता वाढलेली असते. यामुळेच या वयातील अनेक गोष्टी, प्रसंग दीर्घकाळ विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहतात.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे मन आणि मनातील विचार शाळेला समजून घ्यायचे असतात. अर्थातच कोणतीही गोष्ट त्यांच्या मनाविरुद्ध घडली, तर त्याचे दूरगामी परिणाम झालेले दिसून येतात. याचाच अर्थ या वयामध्ये विद्यार्थी नैसर्गिक वातावरणात राहणे गरजेचे असते. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना स्वयंप्रेरित, स्वयंपूर्ण, स्वयंशासित राहणे खूपच आवडते.

शालेय स्तरावरील मंत्रिमंडळात ही संकल्पना एक लोकशाही अनुरूप कशी आहे. याचा बालसंस्कारासाठी कसा उपयोग होऊ शकतो, विद्यार्थ्यांच्या वर्तन प्रभावासाठी कसा परिणामकारक उपयोग होऊ शकतो या परिणामकारक विचारधारेमधून शालेय मंत्रिमंडळाची उभारणी करण्याचे आम्ही शिक्षकांनी ठरवले. शालेय मंत्रिमंडळ व त्याची मुख्य संकल्पना काय आहे त्याची राबवणूक, तसेच त्याची लोकशाही पद्धतीने निर्मिती कशी करावयाची याची माहिती शाळेतील सर्व विद्यार्थी समुहाला करून दिली.

### गरज व महत्व :

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी व त्यांच्या विविध प्रकारच्या सवयी या बाबी विचारात घेऊन शिक्षक आपल्या दैनंदिन अध्ययन–अध्यापनात आवश्यक ते बदल करीत असतात. शालेय मंत्रिमंडळ ही संकल्पना शालेय मंत्रिमंडळ : समूह संस्कारांचा एक मार्ग शाळेतील विद्यार्थी समुहाला समजून दिल्यानंतर तिचा परिणामकारक

प्रभाव विद्यार्थी वर्तनावर कसा पडत जात असतो याचा ऊहापोह होणे महत्त्वाचे असते. शालेय मंत्रिमंडळ ही संकल्पना राजकीय मंत्रिमंडळासारखी जरी वाटत असली, तरी त्यामध्ये मंत्रिपदे व त्यांची कामाची जबाबदारी या गोष्टींना महत्त्व आहे. विविध प्रकारची मंत्रिपदे तयार केली. त्यामध्ये मुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री, आरोग्यमंत्री, शिक्षक–विद्यार्थी समन्वय मंत्री, दैनिक परिपाठ मंत्री अशा प्रकारची खाती तयार केली. या प्रत्येक मंत्र्यांना गोपनीयतेची शपथ देऊन त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. मला इतरांपेक्षा वेगळे कार्य करण्याची जबाबदारी आल्यामुळे अशा विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह आला. त्यांच्या दैनंदिन वर्तन सवयीमध्ये प्रचंड बदल दिसून येऊ लागले.

शाळेमध्ये शालेय मंत्रिमंडळ उभारण्यामागे मुख्य भूमिका अशी की, बालवयातील संस्कार हे त्यांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतात. जबाबदारीने कसे वागावे, जबाबदारी आणि जीवन यांचा समन्वय झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक समर्पणाची भूमिका तयार झाली. भित्रेपणा, लाजरे–बुजरेपणा कमी होऊन त्यांच्यामध्ये साहस तयार झाले. या मंत्रिमंडळातील विविधता व त्यांच्या ठायी असणाऱ्या जाणिवा यांचा बोध विद्यार्थ्यांना होऊन त्यांच्या मनामध्ये इतरांप्रती आपलेपणाची भावना तयार झाली.

बालवयातील संस्कार व शालेय मंत्रिमंडळ हे सर्व विद्यार्थी विकासासाठी पूरक ठरले. विद्यार्थ्यांच्या चांगल्या सवयी वाढल्या. शिक्षणाप्रती असणारी भीती कमी झालेली दिसून आली. अर्थातच शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये समन्वय वाढलेला दिसून आला. शाळा, पालक व समाज अशा उपक्रमांमुळे एकत्र येण्यासाठीचा मार्ग तयार झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणही वाढीस लागलेले दिसून आले. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये एकवाक्यता दिसायला लागली. शिक्षकांच्या अनुपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी शालेय वातावरण सुंदर राखण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात, सदर उपक्रमांच्या प्रभावशील उभारणीमधून शालेय वातावरण अधिक सुकर होऊ लागले.

### उपक्रमाची उद्दिष्टये :

१) शाळा आणि समाजाप्रती विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना वाढीस लागते.

२) विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव तयार करणे.

३) शिक्षक–विद्यार्थ्यांमधील समन्वय वाढीस लावणे.

४) विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांची रुजवणूक करणे.

५) विद्यार्थ्यांमधील विविध प्रकारच्या जाणिवांचा बोध करून देणे.

### कार्यपद्धती :

शाळा हे एक समाजाचे लघुरूपच असते. यासाठी प्राथमिक स्तरापासून बालसंस्कार वृद्धिंगत होणे गरजेचे असते. शाळेमध्ये मंत्रिमंडळ तयार करण्याची संकल्पना या अनुषंगाने शिक्षक–विद्यार्थी समन्वय असणे गरजेचे असते. मंत्रिमंडळ व त्याचे वास्तवरूप याविषयी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली.

## प्रचार व निवडणूक :



प्रचारयंत्रणा व त्याच्या उभारणीसाठी साधारण १० दिवसांचा कालावधी निश्चित करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रचारयंत्रणा कशी राबवावयाची याची माहिती दिली. या अगोदर शाळेतील जाणकार, हुशार व धाडसी विद्यार्थ्यांची नोंद घेऊन त्यांना या सर्व प्रक्रियेची माहिती दिली. यानंतर या मुलांच्या समुहगटाला एकूण दोन गटात विभक्त करून त्यांना लॉटरी पद्धतीने पॅनेलची नावे दिली. त्याचबरोबर लॉटरी पद्धतीने चिन्ह वाटप करून प्रचारयंत्रणा लोकशाही पद्धतीने कशी राबवायची याची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांच्या त्या दोन्ही गटाला करून दिली. या सर्व विषयांची तालीम करून घेतली.

## प्रत्यक्ष निवडणूक व निकाल :



शालेय मंत्रिमंडळ व त्याची निवडणूक प्रक्रिया या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांसाठी थोड्या कठीण होत्या. निवडणूक प्रक्रिया एका निश्चित तारखेला चांगल्या सुसज्ज नियोजनाने करून घेतली. निवडणूकीचा निकाल हा त्याच दिवशी जाहीर करण्याचे ठरले. शालेय मंत्रिमंडळाच्या दोन्ही पॅनेलसमोर मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली हा निकाल जाहीर करण्याचे ठरले. चांगल्या कडक शिस्तीमध्ये निकाल तयार करून स्वतः मुख्याध्यापकांनी तो सर्वांच्यासमोर जाहीर केला.

## खातेवाटप व शपथविधी :

शालेय मंत्रिमंडळामधील विजयी पॅनेलमधील सर्व विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापकांनी विद्यार्थी व शिक्षकांच्या समोर जाहीर अभिनंदन केले. पुढील कामासाठी त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून आवश्यक ते मार्गदर्शन केले. यानंतर पॅनेलमधील सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांनी गोपनीयतेची शपथ दिली. मंत्रिमंडळाचे खातेवाटप करून त्यांच्या कामाबद्दलची त्यांच्या जबाबदारीची माहिती दिली. या वेळी पराभूत झालेल्या पॅनेलमधील प्रमुख विद्यार्थ्यांची विरोधी गट नेता व विरोधी मंडळ तयार करून त्यांच्या कामाबद्दलची, जबाबदारीची माहिती दिली.

**शालेय मंत्रिमंडळाची स्थापना व प्रत्यक्ष राबवणूक :**

शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक, निकाल, शपथविधी खातेवाटप अशा विविध प्रकारच्या टप्प्यांमधून मंत्रिमंडळाची प्रक्रिया पार पडली. यानंतर शालेय मंत्रिमंडळाला मुख्याध्यापक व शिक्षकांनी पूर्ण संमती देऊन पाठींबा दर्शविला. सर्व विद्यार्थ्यांना मंत्रिमंडळाच्या सूचना पाळण्याचे आवाहन करण्यात आले.

शालेय मंत्रिमंडळातील विविध खाती, त्यामध्ये काम करणारे त्यांचे शिष्टमंडळ यांनाही मुख्याध्यापक व इतर सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन करून प्रेरणा दिली. शालेय मंत्रिमंडळातील सर्व खाती व त्यांच्या कामाची जबाबदारी स्वीकारली. प्रत्येक मंत्र्यांच्या कामाची वाटणी झाली. वाटणी झाल्याप्रमाणे विद्यार्थी आपापल्या कामासाठी पुढाकार घेऊ लागले. मुख्याध्यापकांनी शाळेतील प्रत्येक दिवशी परिपाठाला चांगल्या कामाची नोंद घेऊन अभिनंदन केले.

**उपक्रमांचा सारांश :**

प्राथमिक शाळा स्तरावरील विद्यार्थ्यांचा वयोगट काही गोष्टी, माहिती, प्रसंग याबाबत जरी अनभिज्ञ असला, तरी या विद्यार्थ्यांच्या ठायी नैसर्गिक सकारात्मकता प्रभावाने जाणवत असते. या विद्यार्थ्यांकडे स्वयंप्रेरणा विशिष्ट टप्प्यांपर्यंत दिसून येते. परिसराचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या वर्तनात जाणवत असतो. शाळा पातळीवर अशा विद्यार्थ्यांसाठी सुसंस्काराची शृंखला तयार करावी. या विशेष हेतूने शालेय मंत्रिमंडळ व त्याची उभारणी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्‌ अये या उपक्रमांतून धाडसी वृत्तीसह नवचैतन्य निर्माण झालेले दिसून आले. विद्यार्थ्यांमध्ये विशेष वर्तन बदल दिसून येऊ लागले.स्वयंशिस्त, स्वयंप्रेरणा याही गोष्टी विद्यार्थ्यांमध्ये दिसून येऊ लागल्या.

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करुंगली,**
**ता. शिराळा, जि. सांगली.**

# माझी शाळा : एक दृष्टीक्षेप

*''ही आवडते मज मनापासुनी शाळा,*
*लाविते लळा ही, जसा माऊली बाळा''*

शाळेत हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधला जातो. शाळेतून केवळ विद्यार्थी न घडवता त्यांच्यातील खराखुरा माणूस निर्माण होणे अपेक्षित असते. सुजाण नागरिक घडवण्याच्या दृष्टीने शाळा हे उपक्रमांचे मोहळ असायला हवे. माझ्या शाळेचे नाव भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा, वाडेगांव (मुले) : भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि. प. आंतरराष्ट्रीय शाळा, वाडेगांव (मुले) ही जिल्ह्यातील मोठी शाळा आहे. ज्यामुळे गावातील व गावाबाहेरील सर्व विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करणे सुलभ होते. आजमितीला धनेगाव, इंदिरा नगर, नकाशी, देगांव, मानकी, धाडी-बल्हाडी, तामशी, चिंचोली, पिंपळगांव, सस्ती, मळसूर इत्यादी ठिकाणांवरून मुले शिक्षणासाठी या शाळेमध्ये येतात.

**शाळेची यशस्वी वाटचाल :**

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि. प. आंतरराष्ट्रीय शाळा, वाडेगांव (मुले) ही आमची शाळा या विभागातील सर्वांत जुनी शाळा आहे. या शाळेची स्थापना ब्रिटीश काळात सन १८६९ साली झाली. सुरुवातीला या शाळेला बुनियादी शाळा किंवा बेसिक शाळा असे संबोधले जात असे. मात्र ८ मार्च, २०१९ साली महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाचा बहुमूल्य असा आंतरराष्ट्रीय शाळेचा बहुमान शाळेला प्राप्त झाला. शाळेचा नावलौकिक पूर्वीपासूनच चांगला आहे. सन २०२० साली 'मॉडेल शाळा' म्हणूनही या शाळेची निवड करण्यात आली आहे. आज सगळीकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या तुलनेत मराठी माध्यमाच्या शाळांतील पटसंख्या रोडावत असल्याचे चित्र पाहावयास मिळत असताना या शाळेची पटसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

| सन | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|
| पटसंख्या | ५४० | ५७१ | ७२३ | ७४५ | ८३६ |

सन जुलै २०१९ पासून या शाळेने पूर्वप्राथमिक सुरू केले आहेत. त्याला गावकऱ्यांकडून चांगला उत्स्फूर्त प्रतिसादेखील मिळत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे राहू नये म्हणून या शाळेने **'सेमी इंग्रजी'** माध्यमाचा अंगीकार केला आहे. एवढेच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास करण्याच्या उदात्त हेतूने ज्ञानदानाचे अखंड व्रत स्वीकारलेल्या या शाळेने गुणवत्तेच्या आधारे परिसरातील इतर खाजगी शाळांच्या स्पर्धेत आपले स्थान आजही टिकवून ठेवलेले आहे.

## माझ्या शाळेतील उपलब्ध भौतिक सुविधा :

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी येथील शिक्षकवर्ग सतत प्रयत्नशील असतो. येथील शिक्षक उच्चविद्याविभूषीत असून त्यांच्यापैकी मुख्याध्यापकांसमवेत ९ शिक्षक मुंबई येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथून आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण घेऊन आलेले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांच्या सहकार्याने लोकवर्गणीतून जिल्ह्यातील पहिली **'डिजीटल शाळा'** म्हणूनही शाळा नावारूपास आली आहे. आज रोजी शाळेमध्ये ४ प्रोजेक्टर असून प्रत्येक वर्गखोलीमध्ये टीव्ही बसविण्यात आले आहेत. त्यासाठी लागणारी अद्ययावत **वाय-फाय** सुविधासुद्धा कार्यरत आहे. तसेच सन २०२१ पासून शाळेमध्ये **व्हर्चुअल क्लासरूमची** सुविधासुद्धा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. शाळेमध्ये कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी शालेय परिसरामध्ये १० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत. शालेय परिसरात विद्यार्थ्यांचे मन रमविण्याच्या दृष्टीने परिसर चाइल्ड फ्रेन्डली बनविण्यात आला आहे. तसेच संपूर्ण परिसर रंगरंगोटी व सुशोभित करून घेतलेला आहे.

विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी रहावे यासाठी शाळेत सन २०१९ पासून जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. एवढेच नव्हे, तर किशोरवयीन मुलींसाठी सन २०२० पासून शाळेमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेन्डींग मशीन बसविण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या चिकित्सक व सर्जनशीलवृत्तीला वाव देण्याच्या दृष्टीने शाळेमध्ये अटल प्रयोगशाळेची स्थापना केली आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून शाळेमध्ये वर्षभर विविध सहशालेय उपक्रमांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामधून मुलांना नीतीमूल्यांचे धडे देण्यात येतात. येथील पटसंख्या विचारात घेता दैनंदिन परिपाठामध्ये अद्ययावत साऊंड सिस्टमचा वापर करण्यात येतो.

## माझ्या शाळेला मिळालेले बहुमान :

१) ८ मार्च, २०१९ : जिल्ह्यातील चार आदर्श शाळांपैकी एक आदर्श शाळा म्हणून आंतरराष्ट्रीय शाळा बहुमान.

२) ३१ मार्च, २०१९ : राज्यस्तरीय सर्वांग सुंदर शाळा राज्य पुरस्कार

३) ५ सप्टेंबर, २०१९ : मा. राज्यमंत्री रणजित पाटील यांचे हस्ते कृतिशील शाळा पुरस्कार.

माझी शाळा गुणवंत व्हावी यासाठी प्रत्येक जण सतत प्रयत्नशील असतो; पण सर्वांना ते शक्य होत नाही कारण परिसर, भौतिक अडचणी, ध्येयाला समर्पित असणारे शिक्षक सर्वांना मिळत नाहीत. आम्ही आमच्या शाळेत या सर्व गोष्टींना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. यासाठी आम्हाला समाजाचा, अधिकारी वर्ग, पदाधिकारी मंडळी व वरिष्ठांचा मिळालेला सहभाग यातून आपल्यासमोर आंतरराष्ट्रीय शाळा ते मॉडेल शाळा अशी आमच्या शाळेची प्रगती दाखविण्याचा प्रयत्न केला व भविष्यातही या शाळेची प्रगती करण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू.

शेवटी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या सुभाषिताप्रमाणे –

*पाठशाळा असावी सुंदर*
*जेथे मुली मुले होती साक्षर।*
*काम करावयासी तत्पर।*
*शिकतो जेथे प्रत्यक्ष*

**श्री. समाधान विठोबा सोर,**
**उच्च श्रेणी मुख्याध्यापक**
**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय**
**जि. प. शाळा वाडेगाव (मुले)**

# शैक्षणिक स्तर उंचावण्याकडे यशस्वी वाटचाल

*'प्रकाशातले तारे तुम्ही,*

*अंधारावर रुसा,*

*हसा मुलांनो हसा...'*

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा आडसूळ येथील मुले, उमलती फुले 'शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे.' हे ध्येय आहे. ते साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले विविध गुण ओळखून त्यांचा शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपयोग करून घेऊन शिक्षण आनंददायी पद्धतीने अधिक प्रभावी करता येते व ते चिरकाल स्मरणात राहते. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले गुण ओळखून त्यांना प्रोत्साहित केल्याने आत्मविश्वास वाढतो. आत्मविश्वासाने, प्रयत्नाने प्रत्येक गोष्ट साध्य होते. प्रत्येक व्यक्तीमध्ये विशेष गुण असतात ते ओळखून त्याला प्रकाशझोतात आणणे ही भूमिका शिक्षकाने पार पाडली, की विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास नक्कीच वाढतो.

शैक्षणिक साहित्य, कथाकथन, गीतगायन, खेळ यांमधून समाजातील, घरातील, शाळेतील अनुभवातून सहज कळत-नकळत विद्यार्थी विकास होतो. शाळा, विद्यार्थी, समाज हा सांकव मजबूत होतो. विद्यार्थ्यांच्या बालमनाचा विचार करून त्यांच्याबरोबर आपुलकीने वागले, की आपली विद्यार्थ्यांची 'सेना' सदैव तत्पर असते, ही तत्परता ध्येयापर्यंत पोहोचवते. मार्ग सापडला की ध्येय १००% साध्य होते. ग्रामीण भागातही गुणांची खाण आहे. शिक्षकांना फक्त शोध घ्यावा लागतो, एक हात द्यावा लागतो. मग प्रकाशातील तारे चमकायला वेळ लागत नाही. त्यासाठी नावीन्यपूर्ण आणि आनंददायी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यातीलच काही उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) प्रवेश दिंडी, वृक्षारोपण

२) शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग

३) स्थानिक, भौगोलिक परिस्थितीनुसार उपक्रम

४) स्वच्छ आणि सुंदर शाळा.

५) कलाक्षेत्रातील यश.

६) लोकसहभागातून विद्यार्थी विकास.

७) सहशालेय उपक्रम

८) शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश.

९) किशोरवयीन मुलींचे आरोग्य.

१०) मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थी विकास.

११) भाषा/इंग्रजी/गणित-विज्ञान/सामाजिक शास्त्र या विषयात आनंददायी शिक्षण.

१२) आनंददायी शिक्षण

१३) जलसाक्षरता, पर्यावरण पोषक उपक्रम.

**प्रवेश दिंडी :**

वय वर्षे ५ ते ६ या वयोगटातील मुले कुटुंब, व्यक्ती, शेजारी असे विश्व सोडून शाळेतील नवीन वातावरणात आलेली असतात. त्या वेळी ती गोंधळतात, घाबरतात, संकोचतात अशा वेळी त्यांची भीती नाहीशी करून शाळेच्या आनंददायी वातावरणात सहभागी होण्यासाठी इयत्ता पहिली प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी प्रवेश दिंडी काढण्यात आली.

**वृक्षारोपण :**



वृक्षारोपण या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व समजावून सांगणे. मानवाला आरोग्यपूर्ण आणि समतोल जीवन जगण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षांची गरज आहे हे सांगितले जाते. वृक्ष नसतील तर ऑक्सिजन, पाणी, अन्नधान्य अशा जीवनावश्यक गोष्टी मिळणे दुरापास्त होऊन मानवी जीवन संकटात येऊ शकते याकरिता वृक्षारोपणाची आवश्यकता विद्यार्थ्यांना पटवून देऊन विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण करून घेण्यात आले.

**शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग :**



शाळेत होणाऱ्या राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या कार्यक्रमात तसेच राष्ट्रीय उत्सव, सहशालेय उपक्रम, पालकसभा यामध्ये समितीचे सदस्य सहभागी होतात. तसेच विद्यार्थ्यांची आकारिक चाचणी घेऊन पालकांसोबत विद्यार्थी प्रगतीचा आढावा घेतला जातो. विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीसाठी घेऊन जाताना पालक, समिती सदस्य सहभाग घेतात. शाळेचे माजी विद्यार्थी त्यांच्या अनुभवाचा उपयोग विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी त्यांच्या सवडीने शाळेला भेटी देतात.

**स्थानिक व भौगोलिक परिस्थितीनुसार उपक्रम :**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना मिळावी. कलागुणांचा विकास व्हावा यासाठी गावातील गुरुदेव सेवा मंडळाच्या मदतीने शाळेतील विद्यार्थ्यांना तबला, पेटी इत्यादी वाद्य वाजविणे, भजन व भक्तिगीतांचे गायन यांसारखे विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

**स्वच्छ आणि सुंदर शाळा :**

स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि त्यांना स्वच्छतेचे धडे मिळावे यासाठी दैनंदिन साफसफाई, वर्ग सफाईमध्ये सहभागी करून घेतले जाते. शालेय परिसरात वृक्षरोपण करून परिसर सुशोभित केला जातो. संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त 'स्वच्छता दिंडी' हा उपक्रम राबवून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले जाते.

**कलाक्षेत्रातील यश :**

शिवाजी एज्यु. वर्ल्डतर्फे स्वातंत्र्याचा अमृत-महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय देशभक्तीपर गीतगायन स्पर्धेत जि.प. प्राथमिक केंद्र शाळा, आडसूळ येथील मुख्याध्यापिका कु. सुनिता लक्ष्मण बकाल यांचा गट क्र. ५ मधून तृतीय क्रमांक तर कु. चंचल शरद अरबट हिचा गट क्र. ३ मधून तृतीय क्रमांक आला.



तसेच गट क्र. ३ मधून वर्ग सातवीतील विद्यार्थिनी कु. आरुषी राजेंद्र वानखडे, कु. श्रेया विजय वानखडे, कु. स्नेहा अशोक वानखडे यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र मिळाले. या स्पर्धेमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सहभाग असल्याबद्दल शाळेला गुणगौरव पुरस्कार देण्यात आला.

**लोकसहभागातून विद्यार्थी विकास :**

जि. प. प्राथमिक केंद्र शाळा, आडसूळ येथे लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, विविध वाद्ये आणण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना मिळाली.

**समारोप :**

अशाप्रकारे शाळेतील सर्व शिक्षक विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करीत आहेत. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य यांचे शाळा विकासासाठी मोलाचे सहकार्य मिळत आहे. शाळेत विविध उपक्रम राबविल्याने मुलांची आकलनक्षमता वाढून शाळेचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे.

**जि. प. वरिष्ठ प्राथ. केंद्रशाळा, आडसूळ,**
**पं. स. तेल्हारा, जि. अकोला**

◈◈◈

# आदर्श शाळेच्या दिशेने वेगाने घोडदौड करणारी शाळा

२१ वे शतक हे प्रचंड आव्हानांनी भरलेले शतक आहे. या शतकामध्ये सर्वच गोष्टी या वेगवान झाल्या आहेत. तंत्रज्ञानाने आसमंतात भरारी घेतली आहे. प्रत्येक क्षेत्रात आमूलाग्र बदल झालेले आहेत. मग 'शिक्षणक्षेत्रच' त्याला अपवाद कसे राहील? काळाची पावले ओळखून या क्षेत्रानेदेखील कात टाकली आहे. शिक्षणक्षेत्रात तंत्रज्ञानाची प्रचंड क्रांती घडून आली आहे. त्यामुळे स्पर्धा निर्माण झाल्या आहेत आणि या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थीदेखील तेवढेच सक्षम घडवण्याची गरज आहे आणि असेच 'सक्षम' विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्नशील असणारी माझी शाळा म्हणजेच 'जि. प. प्राथ. शाळा सुतारवाडी (कासार आंबोली), ता. मुळशी, जि. पुणे.

आदर्श शाळांच्या यादीमध्ये आमच्या शाळेचे नाव आल्यापासूनच 'आदर्श' हा शब्द सार्थ ठरवण्यासाठी आमच्या तालुक्याचे गटविकास अधिकारी मा. संदीप जठार साहेब, गटशिक्षणाधिकारी मा. किसन भुजबळ साहेब, विस्ताराधिकारी मा. ताम्हाणे साहेब, केंद्रप्रमुख श्री. चौधरी सर, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, ग्रामस्थ पालक आणि शालेय व्यवस्थापक समिती यांनी प्रयत्नाला सुरुवात केली आहे.

आमच्या पंचक्रोशीतील इयत्ता आठवीपर्यंत असणारी जिल्हा परिषदेची एकमेव शाळा. सर्वसामान्य कुटुंबातील आणि कष्टकरी पालकांची, बहुतांश बाहेरील जिल्ह्यातील मुले हीच आमच्या शाळेची दौलत आहे. परप्रांतीय मुलेही आमच्या शाळेत शिक्षण घेत आहेत.

### भौतिक विकास :

शाळेला भव्य इमारत लाभली आहे. वाढती पटसंख्या लक्षात घेता नवीन वर्गखोल्यांची गरज भासत आहे. ग्रामपंचायतीच्या मदतीने लवकरच २ वर्गखोल्या आणि 'आदर्श शाळा' अनुदानातून ५ खोल्या व इतर सुविधा शाळेला प्राप्त झाल्या आहेत.

या शाळेने महाराष्ट्र शासन, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे आणि कोटक एज्युकेशन फाऊंडेशनच्या माध्यमातून Smart- TV, लॅपटॉपसह शाळेतील विद्यार्थ्यांना Tab आणि Smart Board मिळवून देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव दिला आहे.

शाळेने मागील ३ वर्षांत २७ लाख रुपयांचा निधी वस्तुरूपाने मिळवला आहे. शाळेमध्ये AIHV या संस्थेकडून प्रयोगशाळा तसेच राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व महाराष्ट्र शासनाकडून नुकतीच १० लाख रु. किमतीची ATC विज्ञान प्रयोगशाळा प्राप्त झाली आहे, तसेच 'Roo to read' संस्थेने तीन लाख रु. किमतीचे 'स्वतंत्र वाचनालय' शाळेला दिले आहेत. जि. प. पुणे यांचेतर्फे शाळेला आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरवठा होत आहे. Save the child या संस्थेने शाळेची दखल घेऊन नुकतीच Handwash station आणि शालेय परिसरात रंगकाम केले आहे.

अशाप्रकारे सुतारवाडी ही शाळा भौतिक सुविधेने संपन्न होण्यासाठी सज्ज झाली आहे. येत्या १ वर्षात शाळेचा चेहरामोहरा बदलून जाणार आहे.

**वरिष्ठांचे वैयक्तिक मार्गदर्शन :**

आदर्श शाळा विकसन प्रक्रियेमध्ये आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान 'मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र शासन, श्री. सूरज मांढरे साहेब यांचे मार्गदर्शन महिन्याच्या प्रत्येक मंगळवारी सर्वांना लाभते. मा. श्रीम. शोभा खंदारे मॅडम, प्राचार्य, डाएट पुणे, मा. श्रीम. मनिषा यादव मॅडम, आदर्श शाळा समन्वयक, मा. श्री. कृष्णा फडतरे साहेब, अधिव्याख्याते तथा संपर्क अधिकारी, आदर्श शाळा तसेच मा. श्रीम. संध्या गायकवाड मॅडम, शिक्षणाधिकारी पुणे, जि. प. यांची शाळेला भेट देऊन मार्गदर्शन सुरू असते. मा. श्रीम. मनिषा यादव मॅडम शाळेच्या अडचणी व्यक्तिगत विचारून त्यावर मार्गदर्शन करत असतात.

**'उपक्रमांची मांदियाळी' म्हणजे सुतारवाडी :**

होय, अगदी खरे आहे. आमच्या शाळेला 'उपक्रमांची मांदियाळी' असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अगदी 'Bottom to top' वर्गापर्यंत आमच्या शाळेचे उपक्रम सुरू असतात.

**१) संगीतमय परिपाठ :**

शाळेची सुरुवातच होते ती संगीतमय परिपाठाने. प्रत्येक वर्गाचा एक एक दिवस स्वतंत्र परिपाठ असतो. परिपाठातूनच मूल्यसंस्कारांची रुजवण होते. प्रत्येक गुरुजन परिपाठात हिरिरीने सहभाग घेतात. परिपाठामुळे मन प्रसन्न, प्रफुल्लित होऊन मुले दिवसभर टवटवीत राहतात.

**२) ई-लर्निंग (E-learning) अध्यापन :**

अध्यापनात ई-लर्निंग साहित्याचा वापर करून अध्यापन अधिक सुलभ, सुटसुटीतपणे केले जाते. अवघड संकल्पना स्मार्ट बोर्ड (Smart Board) वरून सोप्या करून सांगितल्या जातात. यामुळे विद्यार्थ्यांना अध्यापनाचा कंटाळा येत नाही. आनंदाने मुले अभ्यास करतात.

**३) अरबिंदो सोसायटी :**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे आणि अरबिंदो सोसायटी संस्था यांचेकडून दर मंगळवारी ऑनलाईन सत्राचे आयोजन केले जाते. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी साहित्य कृतिपत्रिका तयार करून मुलांकडून सोडवून घेतल्या जातात तसेच सहावी ते आठवीसाठी Aurobindo चे Auroschollar app चा प्रभावी वापर होत आहे.

**४) खान ॲकॅडमी :**

महाराष्ट्र शासन, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जि. प. पुणे यांचे सौजन्याने 'खान अकॅडमी'मार्फत गणित अध्यापन केले जाते. दर आठवड्याला याच अकॅडमीमार्फत स्वाध्याय देण्याचे काम सुरू असते. विद्यार्थी घरी सराव करून गणित विषयाचा अधिक सराव करतात. यामुळे गणित विषय सोपा झाला आहे.

## ५) १० कलमी कार्यक्रम :

गुणवत्ता वृद्धी होण्यासाठी पुणे जि. प. चे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्यावर्षापासून हा १० कलमी कार्यक्रम शाळेमध्ये राबवण्यात येत आहे. यामध्ये–

| | | |
|---|---|---|
| (१) -- | (२) स्तरनिश्चिती | (३) विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन |
| (४) हस्ताक्षर सुधार | (५) विविध कला गुणदर्शन | (६) सामान्यज्ञान |
| (७) इंग्रजी अध्ययन समृद्धी कार्यक्रम | | (८) शिक्षक सक्षमीकरण |

## ६) कोडिंग प्रोग्रॅम :

महाराष्ट्र शासन, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (SCERT) आणि जि. प., पुणे यांच्या विद्यमाने पुण्यातील निवडक शाळांमध्ये हा कोडिंग प्रोग्रॅम (Coading Programme) संगणकावर सुरू आहे. त्यापैकी एक आमची शाळा होय. श्री. सुमंत देवरे सर कोडिंग प्रोग्रॅमचे प्रशिक्षण मुलांना आठवड्यातून २ दिवस देतात. बाहेरील जगात खर्चीक असणारे Coading शिक्षण मुले विनामूल्य या शाळेत घेऊ लागली आहेत आणि त्याचे उपयोजन प्रोग्रॅम तयार करत आहेत. त्याचे फलस्वरूप प्रथम संस्थेमार्फत आयोजित विज्ञान प्रदर्शनात शाळेला प्रथम क्रमांक मिळाला.

## ७) गोष्टीचा शनिवार :

इयत्ता पहिली ते आठवीसाठी दर शनिवारी एक गोष्ट पीडीएफ व व्हिडिओ स्वरूपात मोबाईलवर किंवा LCD वर दाखवण्यात येते. ज्यामुळे नैतिक विकासास बळ मिळते.

## ८) दप्तराविना शाळा :

दर शनिवारी शाळेत 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम घेतला जातो. शनिवारी योगासने, कवायत, खेळ तसेच अवांतर वाचन इत्यादी उपक्रम घेतले जातात.

## ९) नवोदय शिष्यवृत्ती व इतर स्पर्धा परीक्षा :

शाळेमध्ये नवोदय प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती व इतर NMMS इत्यादी परीक्षांना विद्यार्थी बसवून त्यांचे रोज सकाळी आणि सुट्टीच्या दिवशी जादा तास घेऊन सराव घेतला जातो. तालुक्याचे गटविकास अधिकारी मा. जठार साहेब यांनी जादा तासाबाबत चळवळ उभी करून यावर्षीदेखील गुणवत्तेचा आलेख उंचावला आहे.

## १०) रोबोटीक्स कार्यक्रम :

शाळेला रोबोटीक्स प्रयोगशाळा (Robotic lab) अंतर्गत साहित्य प्राप्त झाले आहे. ऑनलाईन मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष कृतीद्वारे मुले रोबोटीक्स प्रयोगशाळेचे ज्ञान आत्मसात करत आहेत.

## ११) कौशल्यधारीत खजिवी उपक्रम :

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत या कार्यक्रमांतर्गत शिक्षकांना

प्रशिक्षण देण्यात आले आहे. सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तर स्पर्धेकरिता औषधी टॉनिक (काढा), फरची बाहुली, परफ्युम इत्यादी प्रकारचे साहित्य बनवून नेले व उपस्थितांची वाहवा मिळविली.

**१२) विनोबा app चा प्रभावी वापर :**

शिक्षणक्रांतीतील महत्त्वाचे ॲप हे 'विनोबा app'. या ॲपचा प्रभावी वापर करून शाळेतील उपक्रमांची देवाणघेवाण सुरू असते.

**१३) स्पीकिंग इंग्लिश कोर्स :**

कोटक एज्युकेशनचे प्रतिनिधी श्री. सन्ति सर हे दररोज पाचवी ते आठवीसाठी इंग्लिश स्पीकिंग कोर्सची तयारी उत्तमरीत्या करून घेत आहेत. यामुळे इंग्रजी वाचनात सुधारणा होऊन मुले इंग्रजीत संवाद साधू लागली आहेत.


याशिवाय अनेक उपक्रम, सण–समारंभ, महापुरुषांची जयंती–पुण्यतिथी, निपुण भारत अभियान, इंग्रजी अध्ययन समृद्धी कार्यक्रम, मोफत आरोग्य तपासणी, मोफत नेत्र तपासणी, पालक गृहभेटी, पालकांचे मार्गदर्शन, जिल्हा स्तरापर्यंत कला–क्रीडा महोत्सवात बाजी, विज्ञान प्रदर्शनात सक्रिय सहभाग, विविध संस्थांच्या मार्फत. जसे, प्रथम संस्थेमार्फत वैज्ञानिक मॉडेल तयार करणे, प्रयोग प्रात्यक्षिक, TATA Chemical lab तर्फे विज्ञान प्रयोग हाताळणी, प्रात्यक्षिक, रोटरी क्लब ऑफ पुणे यांचेकडून Breast cancer ची मोफत लस, दिवस तो पाढा, स्काऊड गाईड, परिसर सहल, पालखी सोहळा, शाळा प्रवेशोत्सव, वृक्षारोपणासाठी (Seed balls), भोंडला, दहीहंडी, विज्ञानदिन, मोफत हेल्मेट वाटप, गणितीय खेळ, शब्द पाठांतर, पौष्टीक थाळी उपक्रम इत्यादी उपक्रमांची रेलचेल शाळेत सुरू आहे.

हे सर्व उपक्रम शाळेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी निश्चितच फायदेशीर ठरले आहेत. याची फलश्रुती शाळेचा पट वाढीसाठी झाला आहे.

अशाप्रकारे आमच्या जि. प. प्राथ. शाळा सुतारवाडी, (कासार, आंबोली) ता. मुळशी, जि. पुणे ची वेगाने 'आदर्श' शाळा विकसनाकडे घोडदौड सुरू आहे यासाठी महाराष्ट्र शासन, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, विविध संस्था आणि जि. प. पुणे यांचे धन्यवाद!

**श्री. उबाळे विनोद अशोक**
**मुख्या. (पदवीधर शिक्षक)**
**जि. प. प्राथ. शाळा सुतारवाडी (कासार आंबोली),**
**ता. मुळशी, जि. पुणे**

# आदर्श शाळांच्या अनुषंगाने सुरू असणारे उपक्रम







09:00